cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक





नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०१ | सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## माळ दुसरी



द्वितीयेचे दिवशी मिळती चौंसष्ट योगिनी हो ।।
सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो ।।
कस्तुरीमळवट भांगी शेंदूर भरूनी हो ।।
उदोकारें गर्जती सकल चामुंडा मिळुनी हो ।। २ ।।
उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ।। ध्रु।।

# ई-पंचनाम्यांना सर्व्हरचा खोडा; ३५ टक्के ऑथेंटिकेशन प्रलंबित!

## मुदत संपण्यास अवघे काही तास; शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या नोंदी अपूर्ण राहण्याची भीती, ७ ते १० दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात खरीप पिकांच्या नुकसानीची नोंद करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या ई-पंचनाम्यांच्या प्रक्रियेला सर्व्हर आणि मोबाइल नेटवर्कच्या अडथळ्यांचा फटका बसत आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पंचनामे करण्यात आले असले, तरी छायाचित्रे अपलोड करणे, जिओ-टॅगिंग आणि डिजिटल पडताळणी पूर्ण करताना महसूल व कृषी यंत्रणेची दमछाक होत आहे. राज्यभरात सुमारे ३५ टक्के ऑथेंटिकेशन अद्याप प्रलंबित असल्याचा दावा करण्यात येत असून, अंतिम मुदत संपण्यास अवघे काही तास शिल्लक असल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नोंदी अपूर्ण राहण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ई-पंचनाम्यांसाठी किमान सात ते दहा दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी जोर धरत आहे.**




राज्यातील २५० हून अधिक टंचाईग्रस्त आणि दुष्काळसदृश तालुक्यांमध्ये खरीप पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद करण्यासाठी ई-पंचनाम्यांची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करणे, जिओ-टॅगिंगसह छायाचित्रे घेणे आणि संबंधित माहिती ऑनलाइन प्रणालीवर अपलोड करणे आवश्यक आहे. मात्र, राज्यभरातून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात नोंदी होत असल्याने पोर्टलवरील कामकाजाचा वेग मंदावल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक ठिकाणी '५०४ टाइम-आउट' असा त्रुटी संदेश दिसत असल्याने प्रत्यक्ष पंचनामा पूर्ण करूनही त्याची ऑनलाइन नोंद पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. त्यातच शेतकऱ्यांच्या संमतीसाठी आवश्यक असलेला आधारशी संबंधित ओटीपी मोबाइल नेटवर्कअभावी वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागांत नेटवर्कची समस्या अधिक गंभीर असल्याने कर्मचाऱ्यांना एकाच प्रक्रियेसाठी वारंवार प्रयत्न करावे लागत आहेत. त्यामुळे उपलब्ध वेळेत सर्व पंचनाम्यांची नोंदणी

▶▶ पान २ वर

### मुदत वाढवून द्या...

ई-पंचनाम्यांची अंतिम मुदत १२ ऑक्टोबर २०२६ असल्याने उर्वरित नोंदी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडे अत्यंत मर्यादित वेळ शिल्लक आहे. सर्व्हरचा वेग, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि ओटीपी मिळण्यातील अडचणी कायम राहिल्यास मुदतीत सर्व नोंदी पूर्ण होणे कठीण ठरू शकते. याचा सर्वाधिक फटका प्रत्यक्षात पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. कारण पंचनामा प्रत्यक्ष पूर्ण झाला असला, तरी छायाचित्रे अपलोड न झाल्यास किंवा डिजिटल ऑथेंटिकेशन अपूर्ण राहिल्यास संबंधित नोंदींच्या पुढील प्रशासकीय प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात.

## थोडक्यात...

### अटक नाही, तर माझे अपहरण झाले होते-ध्रुव राठी

दिल्लीः यूट्यूबर ध्रुव राठी याने गुरुग्राम पोलिसांवर गंभीर आरोप करत आपले अपहरण करण्यात आल्याचा दावा केला आहे. मला अटक किंवा ताब्यात घेण्यात आले नव्हते, तर माझे अपहरण करण्यात आले, असे त्याने म्हटले आहे. शनिवारी रात्री उशिरा सुटका झाल्यानंतर रविवारी व्हिडिओच्या माध्यमातून त्याने आपली भूमिका मांडली. 'सीजेपी'च्या जंतरमंतरवरील प्रस्तावित आंदोलनात सहभागी होण्यापूर्वी गुरुग्राम पोलिसांनी ध्रुव राठीला ताब्यात घेतले होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी सुमारे ९.३० वाजता सेक्टर ५६ मधील केंद्रीय विहार सोसायटीतील त्याच्या निवासस्थानातून त्याला ताब्यात घेण्यात आले. रविवारी पहाटे ३ वाजता त्याची सुटका केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सीजेपीने आंदोलनाची घोषणा केली होती. मात्र, प्रशासनाने हे आंदोलन होऊ दिले नाही. ध्रुव राठीने 'एक्स'वरील पोस्टमधून पोलिसांना कोणतेही हमीपत्र दिल्याच्या वृत्ताचे खंडन केले. इन्स्टाग्रामवरील एका पोस्टच्या कॅप्शनमध्ये त्याने लिहिले आहे की, मला अटक किंवा ताब्यात घेण्यात आले नव्हते, तर माझे अपहर३ण करण्यात आले होते. व्हिडिओत त्याने आपला भारतीय पासपोर्ट दाखवला.

### प्रकाश राजपुरोहित नवे उप निवडणूक आयुक्त

नवी दिल्लीः केंद्र सरकारने भारतीय निवडणूक आयोगात मोठा प्रशासकीय फेरबदल करत २०१० च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी प्रकाश राजपुरोहित यांची नवे उप निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने या महत्त्वाच्या नियुक्तीला हिरवा कंदील दाखवला आहे. कार्मिक व प्रशिक्षण विभागाने जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, राजस्थान संवर्गाचे (कॅडर) सनदी अधिकारी असलेल्या प्रकाश राजपुरोहित यांच्याकडे एप्रिल २०३० पर्यंत उप निवडणूक आयुक्तपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ते यापूर्वी मे २०२६ पासून संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण उत्पादन विभागात सहसचिव पदावर कार्यरत होते. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने अलीकडेच मंजूर केलेल्या २७ सहसचिव व समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या व्यापक फेरबदलाचाच हा एक भाग आहे. निवडणूक आयोगातील हे मोक्याचे पद गेल्या ऑगस्ट महिन्यापासून रिक्त होते.

# 'हुकूमशाह' मोदींनी आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले

## सीजेपीचा हल्लाबोल; बेकायदेशीरपणे कोणालाही ताब्यात घेऊ नका-सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

'देशात गेल्या ७२ तासांपासून १९७५ च्या आणीबाणी सारखी परिस्थीती निर्माण झाली असून 'हुकूमशाह' मोदींनी आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले आहे. सरकारचे मानसिक संतुलन पूर्णपणे बिघडले असून स्वतःच्याच नागरिकांविरुद्ध युद्ध पुकारत आहे,' असा हल्लाबोल सीजेपीने केला. दरम्यान, बेकायदेशीरपणे कोणालाही ताब्यात घेऊ नका, असा सक्त आदेश सर्वोच्च न्यायालयाने सरकारला दिला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने (सीजेपी) फोडलेल्या डरकाळीने गेल्या दोन दिवसांपासून राजधानी दिल्ली अक्षरशः हादरली आहे. पोलिसांनी

▶▶ पान २ वर

### कोणालाही ताब्यात घेऊ नका...

दिल्लीत सीजेपीद्वारे आयोजित आंदोलनावेळी शांततापूर्णरीत्या एकत्र जमणाऱ्या लोकांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊ नये, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले. तसेच, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन दिल्ली मेट्रोची सेवा सुरळीत चालेल आणि इंटरनेट सेवेत कोणताही व्यत्यय येणार नाही, याची खात्री करण्याचे निर्देश दिले. न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे दिल्लीतील मेट्रो आणि रेल्वे सेवांवर पूर्ण बंदी येणार नाही, या न्यायालयाच्या निर्देशांचे कथित उल्लंघन झाल्याप्रकरणी दाखल केलेल्या अवमान याचिकेवर न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली.

### दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरू

दिल्लीत कडेकोट पोलीस बंदोबस्त असताना, 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) पुकारलेले आंदोलन रविवारी (दि. ११ ऑक्टोबर) सलग दुसऱ्या दिवशीही कायम राहिले. निदर्शकांनी घोषणाबाजी करत जंतरमंतरच्या दिशेने कूच केले. शेकडो आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यावेळी अनेक आंदोलकांना ओढत पोलीस बसेसमध्ये चढवले जात असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. राजधानीच्या विविध भागांतून जंतरमंतरकडे कूच करण्याचा प्रयत्न करत असताना सीजेपीच्या समर्थकांसह 'स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया', 'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन' आणि 'क्रांतिकारी युवा संघटना' यांसारख्या विविध विद्यार्थी संघटनांच्या सदस्यांना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, नवी दिल्लीचे डीसीपी सचिन शर्मा यांनी सांगितले की, परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. आम्ही शांतता राखण्याचा प्रयत्न करत आहोत.

### 'सरकारचा अंत जवळ आला आहे'

सरकारचे मानसिक संतुलन पूर्णपणे बिघडले असून त्याचा अंत जवळ आला आहे, असा दावा सीजेपी सदस्य सौरव दास यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना वाचवण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचा आरोप करत, दास यांनी त्यांना देशविरोधी म्हटले.

# आ.सतीश चव्हाण कोट्यावधीचे मालक !

छ.संभाजीनगर -बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार सतीश चव्हाण काही सामान्य व्यक्ती नाही. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव असलेले सतीश चव्हाण हे तब्बल ३७ कोटी रुपयांचे मालक म्हणजेच कोट्याधीश आहेत ही माहिती त्यांनी उमेदवारी अर्जामध्ये भरली यावरून ते सर्वसामान्य नव्हतं इत्यादीश असल्याचे समोर आले आहे.

होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या पदवीधर मतदार संघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्यासह महाविकास आघाडीचे उमेदवार घुगे आधी ४१ उमेदवार रिंगणात आहेत. या ४१ उमेदवारांपैकी आमदार सतीश चव्हाण यांच्या संपत्तीचा अधिकृत तपशील त्यांच्या निवडणूक शपथपत्राद्वारे समोर आला आहे. शपथपत्रातील माहितीनुसार, सतीश चव्हाण आणि त्यांच्या पत्नी आशा चव्हाण यांची मिळून एकूण मालमत्ता तब्बल ३७.७९ कोटी रुपये इतकी आहे. सतीश चव्हाण आणि पत्नी यांच्या नावावरील आमदार सतीश चव्हाण यांची जंगम मालमत्ता

▶▶ पान २ वर



## टिप्पर-पिकअपच्या धडकेत दोघे सख्खे भाऊ ठार ; तिघे गंभीर

बीड । प्रतिनिधी

मांजरसुंबा येथून नेकनूर मार्गे केजकडे निघालेल्या पिकअपला टिप्परने दिलेल्या जोराच्या धडकेत टिप्पर मधील अंबाजोगाई येथील कुरेशी यांची दोन मुले जागीच ठार झाले. तर अन्य तिघेजण गंभीररित्या जखमी झाल्याची घटना नेकनूर जवळील अंबळाचे बरड येथे रविवारी दुपारी घडली.

▶▶ पान २ वर

# तुळजापुरात आई राजा उदो उदोचा जयघोष!

## तुळजाभवानी मातेच्या घटस्थापनेने शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ

तुळजापूर । प्रतिनिधी

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवाला रविवारी दुपारी १२ वाजता विधिवत घटस्थापनेने प्रारंभ झाला.**

आई राजा उदो उदो, सदानंदीचा उदो उदो या जयघोषाने तुळजापूरनगरी भक्तिमय झाली असून, नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मातेच्या नवरात्र महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, महाराष्ट्रासह कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून भाविक तुळजापूरमध्ये दाखल होत आहेत. भवानी ज्योत घेऊन जाण्यासाठीही भाविकांची मोठी लगबग सुरू होती. शारदीय नवरात्रोत्सवापूर्वी



▶▶ पान २ वर

# जरांगे पाटलांचे जुने सहकारी अमोल खुणेवर बीडमध्ये हल्ला

बीड । प्रतिनिधी

तुळजापूर येथून भवानी ज्योत घेऊन येत असताना पाली येथील नागनाथ मंदिरात दर्शन घेत असताना, अज्ञात काही व्यक्तींनी गेट लावून मनोज जरांगे पाटील यांचे जुने सहकारी अमोल खुणे यांच्यावर हल्ला केला. यात ते जखमी झाले असून, त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत.



मनोज जरांगे यांच्या शिवबा संघटनेचे पदाधिकारी यांनी जुने सहकारी अमोल खुणे यांनी गेल्या काही महिन्यापासून जरांगे पाटील यांच्या विरोधामध्ये मोहीम उघडली आहे. सोशल मीडियाच्या

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०९ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३५.०० क्विंटल | २,७०१ | ३,४०० | ३,०४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ११७.०० क्विंटल | ३,७०१ | ५,९०० | ४,८२२ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १०.५० क्विंटल | ९,३०१ | ९,७२५ | ९,५०५ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,६०० | २,८७२ | २,७७७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ९,७०० | ९,७०० | ९,७०० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ५,७५१ | ७,००० | ६,६१७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,७१० | ६,७१० | ६,७१० |

# ना पदवीधरांचे, ना पक्षाचे, ना समाजाचे!

## १२ वर्षांच्या कार्यकाळावर प्रश्नचिन्ह




सुभाष चौरे । बीड

विधान परिषदेच्या मुदत संपलेल्या छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा) पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यंदा तब्बल ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावत आहेत. यात महायुतीकडून विद्यमान आ.सतीश चव्हाण पुन्हा एकदा



रिंगणात उतरले आहेत. निवडणूक आयोगाकडील प्रतिज्ञापत्रानुसार ते या निवडणुकीतील सर्वात श्रीमंत आणि 'कोट्यधीश' उमेदवार म्हणून पुढे आले असले, तरी त्यांच्या मागील १२ वर्षांच्या कारभारावर आता पदवीधरांमधूनच गंभीर सवाल उपस्थित केले जात आहेत. गेल्या १२ वर्षांत त्यांनी नेमके काय केले? हा प्रश्न विचारत मतदारांमध्ये ना समाजाचे, ना पदवीधरांचे आणि ना पक्षाचे अशी नाराजीची चर्चा रंगू लागली आहे.

मराठवाड्यातील पदवीधरांचे प्रतिनिधित्व करताना सतीश चव्हाण यांनी गेल्या १२ वर्षांच्या प्रदीर्घ कार्यकाळात कोणतीही ठोस किंवा उल्लेखनीय कामगिरी केली नसल्याचा आरोप पदवीधर आणि कर्मचारी वर्गातून होत आहे. उच्चशिक्षित तरुणांचे बेरोजगारीचे प्रश्न असोत, पदवीधरांच्या समस्या असोत किंवा मराठवाड्यातील शाळा-महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन आणि भरतीचे प्रलंबित मुद्दे; हे प्रश्न त्यांनी सभागृहात आक्रमकपणे मांडल्याचे क्वचितच पाहायला मिळाले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळासारख्या मोठ्या शिक्षण संस्थेचे नेतृत्व त्यांच्याकडे असले, तरी संस्थात्मक पातळीवरही शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये अंतर्गत नाराजी असल्याचे बोलले

▶▶ पान २ वर

### बॅनरवरून मुंडेंचा फोटो गायब; महायुतीत वादाची ठिणगी?

महायुतीचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवत असताना मित्रपक्षांच्या सर्व प्रमुख नेत्यांना सोबत घेणे गरजेचे मानले जाते. मात्र, छत्रपती संभाजीनगर आणि परिसरात झळकणाऱ्या प्रचाराच्या फ्लेक्स व बॅनरवरमंत्री पंकजा मुंडे किंवा माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्यासारख्या ओबीसी नेत्यांचे फोटो टाळण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. मराठवाड्यात मुंडे घराण्याला मानणारा सर्व समाजातील मतदार मोठा आणि निर्णायक आहे. या नेत्यांचे फोटोच बॅनरवरून वगळल्याने मुंडे समर्थकांमध्ये नाराजी पसरली असून, हा मतदार महायुतीपासून दूर जाऊन पर्यायी उमेदवाराकडे वळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

### मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सोयीस्कर अंतर...

गेल्या तीन वर्षांपासून संपूर्ण मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा वणवा पेटला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने राजकीय समीकरणे ढवळून काढली आहेत. अनेक पक्षांचे नेते, आमदार आणि मंत्री आंदोलनाला भेटी देऊन समाजासोबत असल्याचा निर्वाळा देत असताना, सतीश चव्हाण यांनी मात्र या संवेदनशील विषयावर नेहमीच सोयीस्कर अंतर राखल्याची टीका होत आहे. समाजाच्या हक्काच्या लढ्यात त्यांची कोणतीही ठाम भूमिका न दिसल्याने मराठा समाजातही त्यांच्याबद्दल तीव्र नाराजी दिसून येत आहे.

cmyk

## अग्रलेख

# विज्ञानाची देशसेवा आणि आत्मविश्वासाची भरारी

आपल्या भारतभूमीत राष्ट्रभक्ती, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठा ही कोणत्याही राजकीय घोषणांवर किंवा राजकीय श्रेयावर अवलंबून नसते, तर ती प्रत्येक भारतीय नागरिकाच्या नसानसात भिणलेली असते. जेव्हा एखादा वैज्ञानिक, शिक्षक, संशोधक किंवा नागरिक स्वतःचे संपूर्ण आयुष्य समाजाच्या आणि देशाच्या सुरक्षेसाठी अर्पण करतो, तेव्हा तोच खऱ्या अर्थाने 'भारत माता की जय' हा नारा कृतीतून साकार करत असतो. डॉ. शैला दिनकर आपटे यांचे संशोधन हे याच स्वदेशी निष्ठेचे आणि राष्ट्रप्रेमाचे एक ज्वलंत उदाहरण आहे.

गुन्हेगारीचा शोध घेताना किंवा न्यायालयात सत्य सिद्ध करताना आज तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल युगात जिथे बनावट आवाज तयार करून गुन्हेगार आणि समाजकंटक दिशाभूल करू शकतात, तिथे डॉ. आपटे यांनी विकसित केलेले 'व्हॉईस फॉरेन्सिक' तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. कोणत्याही राजकीय पाठिंब्याची किंवा श्रेयाची वाट न पाहता, डॉ. शैला आपटे यांनी वयाच्या ६३ व्या वर्षी 'अनुभूती सोल्युशन्स'ची स्थापना केली आणि आज वयाच्या ७२ व्या वर्षीही त्या अविरत संशोधनात मग्न आहेत. त्यांनी विकसित केलेल्या १०० हून अधिक प्रणाली आणि पेटंट मिळालेली उत्पादने आज महाराष्ट्राची सायबर यंत्रणा आणि देशातील न्यायवैज्ञानिक विद्यापीठांमध्य प्रत्यक्ष वापरली जात आहेत. ५०० हून अधिक गुन्हेगारी प्रकरणांच्या तपासात त्यांनी दिलेले योगदान हे केवळ एक तांत्रिक यश नसून, देशातील कायदा व सुव्यवस्था बळकट करण्यासाठी दिलेली मोठी राष्ट्रसेवा आहे. ध्वनीफितीमधील छेडछाड आणि फेरफार ओळखणे. स्पीकर व्हेरिफिकेशन व डायरायझेशन: संशयितांच्या आवाजाची पडताळणी करणे आणि एकाच वेळी बोलणाऱ्या अनेक व्यक्तींचे आवाज वेगळे करणे. नॉइज कॅन्सलेशन व इमोशन डिटेक्शन: पार्श्वभूमीतील गोंगाट दूर करून संभाषण स्पष्ट करणे आणि आवाजातील चढ-उतारांचा वैज्ञानिक अभ्यास करणे. देशाचे रक्षण केवळ सीमेवरच होते असे नाही, तर प्रयोगशाळांमध्ये, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणि न्यायाची बाजू भक्कम करणाऱ्या प्रत्येक प्रयत्नात राष्ट्रभक्ती दडलेली असते. डॉ. आपटे यांनी ११ पीएच.डी. संशोधकांना मार्गदर्शन केले, ८० हून अधिक शोधनिबंध लिहिले आणि इलेक्ट्रॉनिक्स विषयावर पुस्तके लिहून ज्ञानाचा वारसा समृद्ध केला. त्यांच्या या यशाचे श्रेय कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला जात नाही; तर ते त्यांच्या अथक परिश्रमाला, बुद्धिमत्तेला आणि भारतमातेच्या सेवेसाठी असलेल्या वैयक्तिक निष्ठेला जाते. तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगारांचे पितळ उघडे पाडणे आणि निष्पापांना न्याय मिळवून देणे ही विज्ञानाची खरी देशसेवा आहे. डॉ. शैला दिनकर आपटे यांचे कार्य हे सिद्ध करते की, जेव्हा भारतीय प्रतिभा देशहितासाठी उभी राहते, तेव्हा देशाला स्वावलंबी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. अशा राष्ट्रप्रेमी आणि समर्पित संशोधकांना आपला सलाम! भारत माता की जय!

# शिक्षण विभागाच्या चौकशीत मुख्याध्यापक दोषी; बडतर्फीची कारवाई अटळ!

बीड । प्रतिनिधी

**पट पडताळणी मध्ये विद्यार्थी संख्या कमी असल्याने आपल्या शाळेतील शिक्षकाचे पद अतिरिक्त ठरू नये म्हणून थेट उत्तराखंड मधील विद्यार्थी खरेदी करणाऱ्या चंपावती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सारंग जोशी हे शिक्षण विभागाच्या चौकशीत दोषी आढळले आहेत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबतचा अहवाल शिक्षण उपसंचालक आणि संचालक यांच्याकडे पाठवण्यात आला आहे त्यामुळे निलंबन आणि त्यानंतर बडतर्फीची कारवाई होणार हे निश्चित झाले आहे मात्र या सगळ्या प्रकरणात संबंधित केंद्रप्रमुख यांच्यावर कोणती कारवाई होणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.**

पटसंख्या नोंदणी पूर्ण करण्यासाठी ३० सप्टेंबर ही डेडलाईन असल्यामुळे चंपावती प्राथमिक शाळेने तीन विद्यार्थी उत्तराखंड येथून २८ सप्टेंबर रोजी विकत घेतले त्यामध्ये प्रिन्स रामचंद्र विश्वकर्मा, अर्णव रामभवन वर्मा आणि आर्यन चंद्रशेखर या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी आपल्या शाळेत शिकत असल्याचे दाखवून चंपावती शाळेने तसा अहवाल ऑनलाईन सादर केला आणि अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकाला वाचवले. हे सगळे गंभीर प्रकरण वर्तमानपत्राच्या माध्यमातून शिक्षण




संचालक उपसंचालक आणि इतरांच्या लक्षात आल्यानंतर बीडच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती चव्हाण गटशिक्षणाधिकारी श्रीमती गंगाखेडकर यांच्यासहित शिक्षण विभागाच्या पथकाने शुक्रवारी चंपावती शाळेमध्ये भेट देऊन चौकशी केली. या चौकशीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक सारंग जोशी यांनी डाटा एन्ट्री चे काम ज्या इंटरनेट कॅफे मधून होते तेथून हा प्रकार झाला असावा असा खुलासा दिला मात्र शिक्षण विभागाच्या चौकशीत शाळेने २८ सप्टेंबर रोजी हे विद्यार्थी खरेदी केल्याचे आणि सात ऑक्टोबर रोजी परत ड्रॉप बॉक्स मध्ये टाकल्याचे उघड झाले आहे. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बीडच्या शिक्षणाधिकारी श्रीमती चव्हाण यांनी आपल्या विभागाचा गोपनीय अहवाल शिक्षण उपसंचालक आणि संचालक यांच्याकडे पाठवला आहे ज्यामध्ये चंपावती शाळेचे मुख्याध्यापक आणि व्यवस्थापन यांच्याकडून गंभीर चुका झाल्याचे निदर्शनास आले असल्याचे म्हटले आहे या प्रकरणात दोषी असणारे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्यावर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली असल्याचे सूत्रांनी सांगितले दरम्यान मुख्याध्यापक यांच्यासोबतच या विभागाच्या केंद्रप्रमुख श्रीमती कागदे यादेखील दोषी आहेत मात्र या अहवालात त्यांच्यावर कारवाईबाबत काय म्हटले आहे हे कळू शकलेले नाही कदाचित शिक्षण विभागाने आपल्या केंद्रप्रमुखांना वाचवले की काय अशी चर्चा सुरू झाली आहे. शिक्षण विभागाच्या चौकशीत दोषी आढळलेले मुख्याध्यापक सारंग जोशी यांच्यावर सोमवार पर्यंत निलंबन आणि त्यानंतर बडतर्फीची कारवाई होईल अशी माहिती शिक्षण विभागातील सूत्रांनी दिली आहे त्यामुळे संस्थाचालकांच्या तालावर नाचून बेकायदेशीर काम करून शासनाची फसवणूक करणाऱ्या मुख्याध्यापक आणि बोगस शिक्षक यांचे धाबे दणाणले आहे.

# १६ ऑक्टोबरला बीडमध्ये रंगणार 'चंपावती दांडिया महोत्सव'

## महिलांसाठी दांडिया स्पर्धा; आकर्षक पारितोषिकांची मेजवानी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी सांस्कृतिक चळवळ म्हणून नावारूपास आलेल्या चंपावती महोत्सवाच्या भरघोस यशानंतर आता नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिला-भगिनींच्या खास आग्रहास्तव महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य-दिव्य 'चंपावती दांडिया महोत्सव-२०२६' चे आयोजन करण्यात आले असून दांडियाच्या तालावर बीडकरांना उत्साह, जल्लोष आणि सांस्कृतिक परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. बीड शहरातील चंपावती इंग्लिश स्कूलच्या मैदानावर शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा दांडिया महोत्सव रंगणार आहे. या महोत्सवात महिलांसाठी विशेष दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेतील विजेत्यांसाठी विविध**



**आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेनंतर ओपन दांडियाच्या माध्यमातून महिला-भगिनींना दांडियाचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे.**

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिला-भगिनींना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि बीड शहरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करणे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश असल्याचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांनी सांगितले. या महोत्सवाची माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली. तर बीड शहरातील महिला-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन चंपावती दांडिया महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन महोत्सवाचे संयोजक सोमेश्वर कदम यांनी केले आहे. बीडमध्ये दांडियाचा जल्लोष, संस्कृतीचा उत्सव आणि महिला-भगिनींच्या उत्साहाचा रंगतदार सोहळा अनुभवण्यासाठी चंपावती दांडिया महोत्सव सज्ज झाला आहे.

# बीडच्या खासबाग तुळजाभवानी मंदिरात घटस्थापना; नवरात्रोत्सवाला प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

**बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिरात रविवारी पहाटे सहा वाजता आईसाहेबांचा महाअभिषेक आणि मुख्य घटस्थापनेचा विधी पार पडला. राहुल कदम सपत्नीक यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. यासह नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून, दिवसभर देवीच्या दर्शनासाठी बीड शहरासह ग्रामीण भागातील भाविकांची गर्दी झाली होती.**



महाअभिषेकाचा विधी विश्वस्त मंडळाचे राहुल कदम, सुशील उबाळे, प्रीतम लकडे, अमोल चौरे आणि संजय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्य घटस्थापनेचा विधी राहुल कदम सपत्नीक यांच्या हस्ते झाला. पुरोहित मयूर भोगे गुरुजी यांनी धार्मिक विधी पार पाडले. मंदिराचे पुजारी मच्छिंद्रबुवा बन महाराज यांची यावेळी उपस्थिती होती. खासबाग देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविक पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत मंदिरात येत असतात. भक्तांच्या हाकेला धावून येणारी देवी, अशी खासबाग देवीची भाविकांमध्ये श्रद्धा आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरात होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दिनकरराव कदम, सचिव शरदराव घायाळ, सदस्य मंगलताई मोरे, झुंजार धांडे, अमोल चौरे, अभयसिंह कदम, पत्रकार रवि उबाळे, धर्मदाय निरीक्षक ओम गायकवाड, गणेश गरुड, संतोष गिरी, किशोर गिरी, विष्णू गिरी, कैलास शेजाल, अंबादास नवले, विक्रम आमटे, संदीप माने, अजित कदम, संदीप आदमाने, शैलेश गिरी, बालाजी गिरी, आदित्य बन, श्रीधर करमाळकर, बाळासाहेब जगदाळे आणि शुभम गिरी यांच्यासह विश्वस्त मंडळाचे सदस्य व भाविक उपस्थित होते.

# सोलर प्लांटमधील कॉपर चोरीप्रकरणी चौघांना अटक; ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

## आठ सोलर प्लांटमधील चोरी उघड; घरफोडीच्या गुन्ह्याचीही कबुली

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्हयात सोलर प्लांटवरील कॉपर चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या त्याअनुशंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सोलर प्लांटवरील कॉपर चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.**



दिनांक १०/१०/२०२६ रोजी सोलर प्लांटवरील कॉपर चोरी करणाऱ्या आरोपीतांची माहिती घेत असतांना माहिती मिळाली की, दिनांक २४/०९/२०२६ रोजी टाटा पॉवर प्लांट मधील तांब्याचे केवल, एमसी ४ कनेक्टर, वाय कनेक्टर, कॉन्डयुट पॉईप असे इसम नामे १) सुदाम बालु काळे, वय-३५ वर्ष, रा. हातडी, ता. घनसावंगी जि. जालना याने चोरी केलेले आहे. त्यामुळे त्याचा शोध घेत असतांना तो हातडी घनसावंगी येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सदर गुन्हयासह आणखी ०७ सोलर प्लांटवरील कॉपर चोरीचे गुन्हे त्याच्या दोन साथीदारांसह केल्याची कबुली दिली. त्यानंतर गुन्हयातील मुददेमालाबाबत विचारणा केली असता त्याने सदरचा मुददेमाल हा इसम नामे २) गालीब अमर चाऊस, वय-४६ वर्ष, रा.शादी हॉलजवळ, घनसावंगी, ता. घनसावंगी जि. जालना ३) जावेद जिलानी शेख, वय-३६ वर्ष, रा. रवणापराडा, ता. अंबड जि. जालना ४) शकील बशीर शेख, रा. पावरलूम, वय ४२ वर्षे जुनी एमआयडीसी, जालना यांना विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले झाले आहे. आरोपीतांच्या ताब्यातुन खालीलप्रमाणे मुदेदमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच तीर्थपुरी पोलीस ठाणे हददीतील दिनांक ०६/१०/२०२६ रोजी रुई, ता. अंबड जि. जालना येथील एका बंद घराचे लॉक तोडुन त्यामधील दागिने व रोख रक्कम त्याच्या दोन साथीदारांसह चोरी केल्याची कबुली देवून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल व रोख रु.५०००/- काढुन दिल्याने ते गुन्हयाच्या तपासकामी जप्त करण्यात आले आहे. गुन्हयातील फरार आरोपीतांचा शोध सुरु आहे.

# जनता रेल रोको आंदोलन करणार-आत्मलिंग शेटे

परळी वै.। प्रतिनिधी

**दक्षिण मध्य रेल्वेच्या डीआरएम, एडीआरएम यांनी ९ तारखेला सुरू होणारी बिदर-मच्छलीपट्टनम गाडी सुरू होणार नसल्याचे तसेच लातूर-मुंबई ही गाडी ही परळीकडे येण्यासाठी आपली असमर्थता व्यक्त केली. दि.८/१०/२०२६ रोजी रेल्वे पहाणीसाठी आले होते. त्या वेळेस परळी रेल्वे विकास शिष्टमंडळ त्यांना भेटले असता त्यांनी सांगितले.**

ही परळीकरांचा घोर आपमान असल्याचे रेल्वे विकास समितीचे सदस्य तथा माजी रेल्वे सल्लागार समिती सदस्य (डीआरयुसीसी मेंबर) आत्मलिंग शेटे यांनी व्यक्त केले. सिकंदराबाद डिव्हीजन मध्ये सर्वात जास्त उत्पन्न देणारे परळी हे केंद्र असून सध्या फक्त ते मालगाडी जंक्शन झाले आहे. जर परळीकरांना योग्य न्याय मिळाला नाही ९ तारखेला सुरू होणारी जाहीर झालेली मच्छलीपट्टनम गाडी सुरू झाली नाही व परळी-मुंबई गाडी सुरू झाली नाही तर परळीकरांना रेल्वे रोको करून पुढे झोपले तरच गाडी मिळेल असे मत आत्मलिंग शेटे यांनी व्यक्त केले. दि.१७ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी रेल्वे विकास समितीच्या वतीने जी.एस.सौंदळे सर हे आमरण उपोषणला बसले होते सर्व रेल्वे प्रशासन हे हादरून गेले होते. सर्व जनतेचाही पाठींबा वाढत होता. उपोषणासोबतच परळी बंद करण्याचे व उपोषणाला पाठींबा म्हणून विविध व्यापारी असो.परळीच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्याचे ठरले जात होते. परंतु अचानक सिकंदराबाद डिव्हीजनचे डीआरएम व एडीआरएम यांनी त्वरित हालचाल करून बिदर-मच्छलीपट्टनम गाडी ९ तारखेला सुरू करण्यात येईल तसेच सीएसटी परळी-मुंबई ही सुरू करण्याबाबत लवकरच विचार केला जाईल. लातूर-मुंबई ही ३ दिवस परळीतून सोडले जाण्याची शक्यता वर्तवली व या आशा तोंडाला पाने पुसणाऱ्या अधिकाऱ्यांनी फक्त लेखी स्वरूपात आश्वासनाची खैरात केली परंतु परळीकरांच्या पदरात काहीच पडले नाही.

## पान १ वरून...

### ई-पंचनाम्यांना सर्व्हरचा खोडा;

आणि डिजिटल पडताळणी पूर्ण करणे कठीण बनले आहे. एकीकडे प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करण्याचे काम सुरू असताना दुसरीकडे तांत्रिक अडथळ्यांमुळे ऑनलाइन प्रक्रिया रखडत असल्याने यंत्रणेवरील कामाचा ताण वाढला आहे. उपलब्ध विभागनिहाय आकडेवारीनुसार, मराठवाड्यात ई-पंचनाम्यांची नोंदणी ६२ टक्क्यांपर्यंत झाली असून ३८ टक्के ऑथेंटिकेशन प्रलंबित आहे. विदर्भात नोंदणीचे प्रमाण ६५ टक्के असून ३५ टक्के डिजिटल पडताळणी बाकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तुलनेने कोकण विभागात नोंदणीचे प्रमाण ८१ टक्क्यांवर पोहोचले असून १९ टक्के पडताळणी अद्याप प्रलंबित आहे. या आकडेवारीवरून राज्यातील अनेक भागांत ई-पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम बाकी असल्याचे स्पष्ट होते. या परिस्थितीत केवळ तांत्रिक अडचणींमुळे पात्र नुकसानग्रस्त शेतकरी मदतीच्या प्रक्रियेपासून वंचित राहू नयेत, यासाठी ई-पंचनाम्यांना किमान सात ते दहा दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी महसूल व कृषी यंत्रणेतील संबंधितांकडून करण्यात येत आहे. तसेच इंटरनेट उपलब्ध नसलेल्या भागांत ऑफलाइन पद्धतीने माहिती नोंदविण्याची आणि नेटवर्क उपलब्ध झाल्यानंतर ती ऑनलाइन अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची अपेक्षाही व्यक्त होत आहे. अशा पर्यायी व्यवस्थेमुळे प्रत्यक्ष पंचनामे पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांच्या नोंदी केवळ तांत्रिक कारणांमुळे अपूर्ण राहण्याचा धोका कमी होऊ शकतो.

-----------

### आ.सतीश चव्हाण

: रु. ८.०५ कोटी, स्थावर मालमत्ता : रु. २१.६८ कोटी. अशी एकूण रु. २९.७३ कोटी. तर पत्नी आशा चव्हाण यांची जंगम मालमत्ता रु. ४.७४ कोटी. स्थावर मालमत्ता- रु. ३.३० कोटी, अशी एकूण रु. ८.०५ कोटीची मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, सतीश चव्हाण यांच्याकडे १,०७५ ग्रॅम आणि आशा चव्हाण यांच्याकडे १,६०६ ग्रॅम असे मिळून २ किलो ६८१ ग्रॅम सोने असून त्याचे एकूण मूल्य ३.६६ कोटी रुपये आहे. याशिवाय १० किलो चांदी असून त्याचे मूल्य २४.४० लाख रुपये नमूद केले आहे. सोबतच ३ लाख रुपये मूल्याचे हिरे त्यांच्याकडे आहेत. त्यांच्याकडे २०२२ मध्ये खरेदी केलेली महिंद्रा स्कॉर्पिओ एन ही गाडी असून तिची खरेदी किंमत २९,०९,५४० रुपये आहे. स्थावर मालमत्तेच्या एकूण आठ नोंदी असून, दोघांवर मिळून एकूण ६.१९ कोटी रुपयांचे कर्ज आहे. यामध्ये सतीश चव्हाण यांच्या नावावर ५.५४ कोटी कर्ज तर आशा चव्हाण यांच्या नावावर ६४.२६ लाख कर्ज आहे. पदवीधर मतदार संघात निवडणूक लढवत असलेल्या एकूण उमेदवार पैकी चव्हाण हेच कोट्याधीश उमेदवार असल्याचे दिसत आहे.

-------

### 'हुकूमशाह' मोदींनी आणीबाणीच्या

आंदोलक व त्यांच्या नेत्यांची धरपकड करीत शेकडो जणांना ताब्यात घेतले. 'सीजेपी'चे प्रमुख अभिजित दीपके व त्यांचे सहकारी सौरव दास, आशुतोष रांका यांना दिल्लीत दाखल होताच विमानातच ताब्यात घेतले होते. रविवारी न्यायालयाने त्यांची काही अटींसह सुटका केली. त्यानंतर आशुतोष रांका आणि सौरभ दास यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारवर जहरी टीका केली. यावेळी आशुतोष रांका म्हणाले की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे भाजपला निवडणुका जिंकण्यास मदत करण्यासाठी काम करत आहेत. गेल्या ७२ तासांत देशात अशा काही घटना घडल्या आहेत ज्यांची कोणीही कल्पना केली नसेल. सीजेपीचा लढा हा निवडणूक आयोग आणि ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आहे. देशाचे रक्षण आणि प्रगती करण्याची जबाबदारी असलेल्या या निवडणूक आयोगाने आपली भूमिकाच धोक्यात आणली आहे, असा आरोप रांका यांनी केला. दिल्लीत आंदोलकांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत बोलताना रांका म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी गेल्या ७२ तासांत आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले आहे. पंतप्रधान मोदींचे वर्णन 'हुकूमशाह' असे करत त्यांनी निदर्शनांशी संबंधित पोलीस कारवाई व अटकेच्या घटनांवर टीका केली. दिल्लीतील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या अटकेच्या घटनांवरून, 'सीजेपी'ने सरकारवर नागरिकांशी युद्ध पुकारल्याचा आरोप केला आहे. पक्षाने आंदोलकांवरील कारवाईवर टीका करत ताब्यात घेतलेल्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबाबत चिंता व्यक्त केली. सीजेपी नेते सौरव दास म्हणाले की, देशात १९७५ मधील परिस्थितीसारखीच आणीबाणीसदृश स्थिती निर्माण झाली आहे. सरकार देशाला गृहयुद्धासारख्या परिस्थितीकडे ढकलत असून स्वतःच्याच नागरिकांविरुद्ध युद्ध पुकारत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

-------------

### जरांगे पाटलांचे जुने सहकार

माध्यमातून त्यांच्यावर अनेक आरोप अमोल खुणे यांनी केले आहेत. त्यामुळे समाजाची त्यांच्यावर नाराजी आहे. रविवारी घटस्थापनेच्या दिवशी ते ज्योत घेऊन जालन्याकडे जात असताना, पाली तालुका बीड येथील नागनाथ मंदिरामध्ये ते दर्शनासाठी गेले असतानाच अचानक त्यांच्यावर एका टोळक्याने हल्ला केला. मंदिराचे गेट बंद करत त्यांना जबर मारहाण केली व त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. आरडाओरड आणि गोंधळ सुरू झाल्याने या भागातील नागरिक जमा झाले आणि हल्ला करणारे पसार झाले. त्यानंतर अमोल खुणे यांना एका वाहनातून उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. यानंतर जरांगे यांच्या समर्थकांनी केला असल्याचा आरोप अमोल खुणे यांनी केला आहे. आता यापुढे जरांगे यांची माझ्याशी गाठ आहे, असा देखील इशारा अमोल खुणे यांनी दिला आहे. घडलेल्या घटने संदर्भात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

--------------

### तुळजापुरात आई राजा उदो उदोचा

श्री तुळजाभवानी मातेची पारंपरिक मंचकी निद्रा सुरू होती. आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या पहाटे ही निद्रा संपल्यानंतर मातेची मुख्य मूर्ती पुन्हा सिंहासनावर विराजमान करण्याची धार्मिक प्रक्रिया पहाटे पार पडली. या विधीला मंदिरातील परंपरेनुसार विशेष महत्त्व आहे. मातेच्या मुख्य मूर्तीला पंचामृत अभिषेक, नित्योपचार पूजा, वस्त्रालंकार, नैवेद्य, धूपारती आणि अन्य धार्मिक विधी करण्यात आले . त्यानंतर दुपारी १२ वाजता सिंह गाभाऱ्याजवळ विधिवत घटस्थापना करण्यात आली. या धार्मिक सोहळ्यात भोपे-पुजारी तसेच जिल्हाधिकारी डॉ. कीर्ती किरण पुजार आणि त्यांच्या पत्नी यांचाही सहभाग होता. नवरात्रोत्सवात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन दर्शन व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले आहे. घाटशीळ रस्त्यावरील तात्पुरत्या दर्शन मंडपाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. भाविकांना बीडकर पायरी मार्गे दर्शन मंडपात प्रवेश देण्याचे नियोजन करण्यात आले असून, गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी मंदिर परिसरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

**नऊ दिवस धार्मीक कार्यक्रम...**

दरम्यान, नवरात्रोत्सवाच्या काळात दररोज मातेची विधिवत पूजा-अर्चा आणि सायंकाळी छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे. नवरात्रातील पुढील टप्प्यांत मातेच्या विविध रूपांतील अलंकार महापूजा बांधण्यात येणार असून, भाविकांना या पूजांचे दर्शन घेता येणार आहे. मंदिर परिसरात अखंड वेदपठणासाठी स्थानिक ब्रह्मवृंदांना आमंत्रित करण्यात येणार असून, धार्मिक विधींमुळे तुळजापूर नगरीत नऊ दिवस भक्तिमय वातावरण राहणार आहे.

--------------

### टिप्पर-पिकअपच्या धडकेत

अंबाजोगाई येथील व्यापारी शौकत कुरेशी हे बीड जिल्ह्यातील अनेक आठवडी बाजारामध्ये भाकड जनावरांचा व्यवसाय करतात. रविवारी नेकनूर येथे आठवडी बाजार असल्याने त्यांची दोन मुले व काही कामगार नेकनूरकडून अंबाजोगाईकडे येत असताना अंबलाचे बरड येथे टिप्पर आणि पिकअपच्या झालेल्या अपघातामध्ये टिप्पर मधील एक बैल व दोन गाय यांचा तर मृत्यू झालाच पण शौकत कुरेशी यांचे मुले हनीफ शौकत कुरेशी वय २२ वर्षे व आर एफ शौकत कुरेशी वय २० वर्षे या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर पप्पू यादव, अमोल खंदारे व अन्य एक जण जखमी झाले. या अपघात प्रकरणी नेकनूर, केज आणि नांदूर फाटा पोलिसांनी येऊन पाहणी करत पंचनामा केला.

-----------

### ना पदवीधरांचे, ना पक्षाचे,

जात आहे. त्यामुळे हा वर्ग या निवडणुकीत त्यांना कितपत साथ देईल, याबाबत राजकीय वर्तुळात साशंकता व्यक्त केली जात आहे. चव्हाण यांच्या राजकीय निष्ठेवरही विरोधकांकडून आणि खुद्द पक्षांतर्गत कार्यकर्त्यांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. गंगापूर विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी घेतलेली राजकीय भूमिका आणि त्यानंतरची राजकीय समीकरणे यामुळे त्यांची निष्ठा नेमकी कोणाशी, असा संशय निर्माण झाला आहे. पराभवानंतर पुन्हा पक्षीय पातळीवर जुळवून घेण्याचा प्रयत्न झाला असला, तरी त्यांच्या 'स्वतःच्या मर्जीनुसार' चालणाऱ्या कारभारामुळे महायुतीमधील घटक पक्षही काहीसे सावध भूमिकेत दिसत आहेत. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या निवडणुकीत चव्हाण यांना कितपत मनापासून स्वीकारतील, याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. महाविकास आघाडीमध्ये दोन उमेदवारांमुळे बंडखोरीचे चित्र दिसत असले, तरी सतीश चव्हाण यांच्या स्वतःच्या कार्यपद्धतीमुळे आणि मित्रपक्षांच्या नाराजीमुळे त्यांची सुरुवातीपासूनच कोंडी होताना दिसत आहे. कोट्यवधींची मालमत्ता असूनही कामाचा लेखाजोखा शून्य असल्याचा आरोप होत असल्याने, यंदा मराठवाड्यातील पदवीधर मतदार नव्या पर्यायाच्या शोधात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १२ ऑक्टोबर २०२६ | ३

## थोडक्यात



### नारायण झोडगे यांचा छत्रपती नगरातील रहिवाशांच्या वतीने सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

संगमनेर येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार नारायण झोडगे यांना मिळाल्याबद्दल माजलगाव येथील छत्रपती नगरातील रहिवाशांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच स्पायर फाउंडेशन नाशिकच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मनीषा कोल्हे यांना मिळाल्याबद्दल त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक भागवतराव भोसले, सदाशिव नाटकर, जयंत मगर, श्रीकृष्ण चाळक, ड .अरुणराव कुलकर्णी, लक्ष्मण खंडगावे, नामदेव बोबडे, ड . साहेबराव आचार्य, लक्ष्मण मोरे, शिंगणे सुखदेव निर्मळ, संजय अंबुरे, ड . सतीश शिंदे, शिवराज सोळंके, रामेश्वर डावकर, बाळासाहेब डावकर, नाईकनवरे, ज्ञानेश्वर काटे सुधाकर जाधव यांची उपस्थिती होती.

### राजस्थानी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील क्रिकेटपटूची विभागीय स्पर्धेसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्था, माजलगाव संचलित राजस्थानी माध्यमिक विद्यालयातील १४ वर्षांखालील क्रिकेट संघातील १६ खेळाडूंची विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या निवडीमुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये विराज ज्ञानेश्वर धायगुडे,साईराज सुनील राठोड, शिवम अंकुश जाधव,सार्थक सोमनाथ मुंडे, विवेकराज भाऊराव तौर, अथर्व महेंद्र काळे, आदित्य विश्वंभर जोशी,हर्षद बाळासाहेब सातपुते,गोपाल दत्तात्रय गांजापुरे, समर्थ सुरेश तौर, आर्यन विलास रडे,शिवाजी दीपक सटाले, कैवल्य दशरथ सोळंके,अर्णव दत्ता अंबलकर, श्रेयस सोमनाथ मुंडे आणि यशराज अशोक शेंडगे या खेळाडूंचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.आर.जे. बजाज, सचिव रामानंदजी लड्डा व कोषाध्यक्ष रमेशचंद्र कासट तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक तौर सर, या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक मुंडे सर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




बेलगाव ते माहूरगड जवळपास साडेचारशे किलोमीटर अंतर पार करून बेलगाव येथील ४०० ते ५०० तरुण मोठ्या भक्ती भावाने रेणुका मातेचा जागर करत ज्योत आष्टी शहरात दाखल त्यांचे स्वागत लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानासमोर या युवकांचे स्वागत करून चहा बिस्कीट पाणी बॉटल वाटप करण्यात आली. छाया सचिन रानडे

# आरिफ शेख मृत्यू प्रकरणी कुटुंबीयांकडून घातपाताचा संशय

## पोलीस प्रशासनाच्या तपासावर उपस्थित केला प्रश्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील १९ वर्षीय ऊसतोड मजूर आरिफ शेख याचा मृतदेह निवडुंग्या परिसरात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या मृत्यूबाबत आरिफच्या कुटुंबीयांनी घातपाताचा संशय व्यक्त करत पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे आणि कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह (बाळा) बांगर यांनी केली आहे.

कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी गहिनीनाथगड-चिंचोली परिसरातील एका मुकादमासह त्याच्यासोबत असलेल्या दोन व्यक्ती आरिफला त्याच्या राहत्या घरातून घेऊन गेल्या होत्या. त्यानंतर रविवार, २७ सप्टेंबर रोजी निवडुंग्या परिसरात आरिफचा मृतदेह आढळून आला. घरातून घेऊन गेल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांनी या घटनेबाबत संशय व्यक्त केला आहे. आरिफच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, संबंधित मुकादम मागील सहा महिन्यांपासून आरिफ आणि त्याच्या कुटुंबीयांना धमक्या देत होता. यापूर्वी आरिफला मारहाण करण्यात आल्याचाही आरोप कुटुंबीयांनी केला आहे. मृतदेह पाहिला असता त्याच्या शरीरावर गंभीर जखमा दिसून आल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. त्यामुळे आरिफचा मृत्यू नेमका



कोणत्या परिस्थितीत झाला, याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणी आपली व्यथा मांडण्यासाठी कुटुंबीय अमळनेर पोलीस ठाण्यात गेले असता, पोलिसांनी आपले म्हणणे योग्य प्रकारे ऐकून घेतले नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. तसेच पोलिसांनी हा अपघाती मृत्यू असल्याचे सांगितल्याचा दावाही कुटुंबीयांनी केला आहे.

शवविच्छेदन अहवालासंदर्भातील कागदपत्रे आणि पंचनाम्याच्या प्रक्रियेबाबतही कुटुंबीयांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित कागदपत्रांवर सह्या घेण्यात आल्या; मात्र पंचनाम्यावर सह्या घेण्यात आल्या नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या प्रक्रियेबाबतची वस्तुस्थिती तपासून स्पष्ट करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. आरिफच्या मृत्यूबाबत कुटुंबीयांनी व्यक्त केलेला संशय आणि त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह बाळा बांगर यांनी या प्रकरणात आवाज उठविला आहे. आरिफच्या मृत्यूचे सत्य समोर यावे, कुटुंबीयांच्या आरोपांची गांभीर्याने दखल घ्यावी आणि तपास निष्पक्षपणे करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. अवघ्या १९ वर्षांच्या तरुणाचा मृत्यू आणि त्याबाबत कुटुंबीयांनी केलेले गंभीर आरोप यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. शवविच्छेदन अहवाल, घटनास्थळावरील पुरावे, संबंधित व्यक्तींचे जबाब आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आरिफ शेखच्या मृत्यूमागील सत्य समोर यावे, कुटुंबीयांच्या शंकांचे निरसन व्हावे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे. आता या प्रकरणातील पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कासारी येथे जलजागृती रॅली उत्साहात संपन्न

## पाणी बचत, जलसंवर्धन आणि रोजगारनिर्मितीबाबत जनजागृती

दिंद्रुड । प्रतिनिधी

सध्या परिसरात निर्माण झालेली पाणीटंचाई व दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन पाण्याचे महत्त्व, पाणी बचत आणि जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी धारूर तालुक्यातील कासारी येथे शनिवार, (दि. १० ऑक्टोबर )रोजी जलजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला विद्यार्थी, शिक्षक, युवक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारी, नाथकृपा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कासारी, ग्रामपंचायत कार्यालय कासारी आणि हेल्पींग हँण्डस सोशल डेव्हलोपमेंट कासारी यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीच्या माध्यमातून पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे आणि जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायत प्रशासक, तलाठी, ग्रामसेवक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारीचे श्रीहरी बडे, नाथकृपा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य भगवान चाटे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवान बडे सर, श्यामसुंदर बडे, पोलिस पाटील प्रशांत घुले, प्रशांत उघडे, ज्ञानोबा बडे, दादासाहेब बडे, अंकुश बडे, राजू सय्यद, गोरक्षनाथ बडे, जमीर सय्यद, अतुल चोपडे, यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.रॅलीनंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना पाणी बचत, जलसंवर्धन आणि दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले. तसेच गावात रोजगारनिर्मितीच्या संधी आणि ग्रामविकासाच्या विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## पान ६ वरुन...

### नाका परिसरातून सव्वा लाखांच्या

(क्र. MH 23 BF 0653) पांढऱ्या पिशवीतून मुद्देमाल नेताना दिसला. पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने आपले नाव महिपाल नारायणा कोमिडी (वय ४८ वर्षे, रा. ईसान नगर, ता. डोमाकोंडा, जि. निजामाबाद; सध्या रा. आदर्शनगर रोड, बीड) असे सांगितले.

पोलिसांनी केलेल्या झडतीत २४ हजार रुपये किमतीच्या 'रॉयल स्टॅग' विदेशी दारूच्या ९६ बाटल्या, ७ हजार २०० रुपये किमतीच्या 'क्लासिक गोल्ड व्हिस्की'च्या ४८ बाटल्या तसेच वाहतुकीसाठी वापरलेली सुमारे ८० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण १ लाख ११ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी महिपाल कोमिडी याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, पोलीस उपअधीक्षक राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, पोलीस हवालदार मच्छिंद्र राख, पोलीस शिपाई सचिन आगलावे, लिंबा महानोर व राजेभाऊ जाधव यांच्या पथकाने केली.

### शिवाजीनगर पोलिसांची

सापळा रचून या दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

आयुब शेर महंमद (वय ३० वर्षे)

अल्ताफ असलम पठाण (वय २९ वर्षे)(दोन्ही रा. गोरे वस्ती, बालेपीर, बीड) सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच पोलीस उपअधीक्षक नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश पंडित, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस हवालदार रवींद्र आघाव आणि पोलीस अंमलदार शिवदास घोलप यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

### नवरात्रोत्सवात ज्योत घेऊन येणाऱ्या

माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश भाऊ सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष भारत भाऊ मुरकुटे, सभापती शरीफ भाई शेख यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते.

श्रद्धा, सेवा आणि आपुलकीचा संगम!

नवरात्र महोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून भक्ती, एकता आणि सेवाभाव जपण्याचा काळ आहे. ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांचे सन्मानपूर्वक स्वागत करत त्यांना आवश्यक सुविधा देण्याच्या या उपक्रमामुळे भक्तांप्रती असलेली आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली. धार्मिक परंपरेचा सन्मान राखत भाविकांच्या सेवेसाठी पुढाकार घेण्यात आल्याने या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले.

### घटस्थापनेने वडवणीच्या

आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक मोठी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिल्या माळेदिवशी रविवार रोजीपासूनच वडवणीसह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळी ७ वाजताच्या व सायंकाळी ७ वाजताच्या मातेच्या आरतीस देखील याठिकाणी महिलांसह भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. दि.१७ शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता सातव्या माळेला मंदिरापासून मातेची नगरप्रदक्षिणा पालखी मिरवणूक निघेल ती पुढे संपूर्ण शहरातून जात समारोप परत मंदिरात होईल. दि.२० मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरात रावणदहन संपन्न होईल. तसेच दि.२५ रविवार रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदिरात रात्री १२ वाजता दुध महाप्रसाद संपन्न होईल. या नवरात्रोत्सवात सुंदर अशा मंडपामुळे मंदिर परिसर अधिकच सुंदर दिसत असून या ठिकाणी लावण्यात आलेल्या वेगवेगळ्या रंगाच्या विद्युत रोषणाईने रात्री हा परिसर अधिकच आकर्षक व नयनरम्य दिसून येत आहे. तरी या नवरात्रोत्सवाच्या दरम्यान आयोजित सर्व कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहनही यावेळी श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.

**धार्मिक कार्यक्रमांची रुपरेषा:-**

* दि.१७ ऑक्टोबर २०२६ शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता सातव्या माळेला मंदिरापासून मातेची नगरप्रदक्षिणा पालखी मिरवणूक निघेल ती पुढे संपूर्ण शहरातून जात समारोप परत मंदिरात होईल. * दि.२० ऑक्टोबर २०२६ मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरात रावणदहन संपन्न होईल. * दि.२५ ऑक्टोबर २०२६ रविवार रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदिरात रात्री १२ वाजता दुधाचा महाप्रसाद संपन्न होईल.

### शाहूनगरमधील महालक्ष्मी

धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये प्रामुख्याने संगीतमय देवी भागवत कथा, शोभायात्रा, नवचंडी याग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. आज रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता घटस्थापना व आरतीने महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. मंगळवार, १३ ऑक्टोबरपासून देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून, रविवार, १८ ऑक्टोबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत कथा संपन्न होणार आहे. सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कथेची सांगता होणार आहे. कथेच्या माध्यमातून देवीमाहात्म्य, भक्ती आणि आध्यात्मिक विचारांचे श्रवण करण्याची संधी भाविकांना मिळणार आहे तरी भाविक भक्तांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## केंद्रीयमंत्री रामदास आठवलेंच्या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा -संभाजी गायकवाड

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं भटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, नागेश आण्णा दुबळे, अक्षय कोकाटे, के. के. कांबळे, रतन वाघमारे, पप्पू वाघमारे, सन्नी जोगदंड, अमोल मिटकर, लखन जाधव, विजय डोळस, अभिषेक जोजारे, रोहित गायकवाड, करण वाघमारे, अशोक भाले, राम पवार, तुषार गायकवाड, साईनाथ जाधव, रोहित डोंगरे, कृष्णा वैष्णव, आकाश वाघमारे, आरशान शेख, विशाल माने, रितेश गुंजाळ ओमकार गायकवाड, ए. एच. गायकवाड, परसराम जाधव, महेश काळे आदिनी केले आहे.

## मंत्री रामदास आठवले यांची विराट सभा यशस्वी करा-अविनाश जोगदंड

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं शहर अध्यक्ष अविनाश जोगदंड, संभाजी गायकवाड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, अड सुरेश वडमारे, नागेश (आण्णा) दुबळे, दिलीप खंदारे, भैय्यासाहेब मस्के, शाम वीर,भैय्या साळवे, महेंद्र वडमारे, दयानंद उजगरे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, पप्पू वडमारे, के.के. कांबळे, आप्पा मिसळे, गौतम कांबळे, जितू धन्वे, संजय हनवते सोनू वडमारे, दिपक कांबळे, गणेश वाघमारे, अजिंक्य वडमारे आदिनी केले आहे.

# दुष्काळात कडा कारखाना सुरू करण्याचा अट्टाहास कशासाठी ?

## मतदारसंघात पिण्याच्या पाण्याची टंचाई; चारा-पाण्याअभावी पशुपालकांची कसरत, मग कारखान्यासाठी पाणी-ऊस कुठून आणणार? माजी सरपंच विष्णू खाडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघात दुष्काळसदृश परिस्थितीने गंभीर रूप धारण केले असताना, अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेतकरी पिके वाचविण्यासाठी धडपडत आहेत, तर पशुपालकांसमोर चारा व पाण्याचे संकट उभे ठाकले आहे. अशा परिस्थितीत कडा सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचा अट्टाहास नेमका कशासाठी? असा सवाल आता शेतकरी, पशुपालक व नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

कारखाना सुरू करण्यासाठी पुरेशा प्रमाणात ऊस उपलब्ध आहे का, कारखान्याच्या गाळप क्षमतेनुसार ऊस मिळणार आहे का, तसेच कारखाना सुरू झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या पाणी व चाऱ्याच्या अतिरिक्त गरजेची पूर्तता कशी केली जाणार, याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर; कारखान्यासाठी पाणी कुठून?

मतदारसंघातील काही गावांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. जलस्रोत आटत चालले असून उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचे सावट गडद होत आहे. अशा परिस्थितीत साखर कारखाना सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले पाणी कोठून उपलब्ध करून दिले जाणार, हा कळीचा प्रश्न आहे.

कारखान्यावर येणारे ऊसतोड मजूर, त्यांची कुटुंबे आणि त्यांच्यासोबत येणारे पशुधन यांच्यासाठी स्वतंत्र पाणी व्यवस्था कोण करणार? दुष्काळी परिस्थितीत टँकरच्या पाण्यावर कारखाना आणि संबंधित यंत्रणा चालविणे कितपत व्यवहार्य आहे, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

ऊस किती? गाळप क्षमता किती?

कारखाना सुरू करण्यासाठी प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या ऊसाची अधिकृत आकडेवारी जाहीर करणे आवश्यक आहे. तालुक्यातील ऊस क्षेत्र किती आहे? त्यापैकी प्रत्यक्ष गाळपासाठी उपलब्ध ऊस किती? कारखान्याची प्रस्तावित गाळप क्षमता किती? या प्रश्नांची उत्तरे सभासद व शेतकऱ्यांसमोर येणे गरजेचे आहे.

ऊस उपलब्ध नसताना कारखाना सुरू केल्यास बाहेरील भागातून ऊस आणावा



लागू शकतो. त्यातून वाहतूक खर्च वाढण्याबरोबरच कारखान्याच्या आर्थिक व्यवहार्यतेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

**कारखाना आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहे का?**

उपलब्ध ऊस, पाणी, मजूर, वाहतूक, उत्पादन खर्च, बाजारभाव आणि अपेक्षित उत्पन्न यांचा सर्वंकष अभ्यास करूनच कारखाना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे का? याबाबतचा आर्थिक व्यवहार्यता अहवाल सार्वजनिक करण्यात यावा. कारखाना अपेक्षित क्षमतेने चालला नाही अथवा तोट्यात गेला, तर त्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी कोण घेणार? सभासदांच्या हिताला त्याचा फटका बसणार नाही ना? याचीही स्पष्टता आवश्यक आहे.

कर्ज, तारण व्यवहारही पारदर्शक हवेत

कारखाना सुरू करण्यासाठी कोणत्या बँक अथवा वित्तीय संस्थेकडून निधी उपलब्ध होत आहे? किती कर्ज घेतले जाणार आहे? कर्जाच्या अटी काय आहेत? कोणती जमीन किंवा मालमत्ता तारण ठेवण्यात आली आहे? या सर्व बाबींची माहिती सभासद व जनतेसमोर जाहीर करावी. कारखान्याची जमीन किंवा इतर मालमत्ता तारण ठेवण्यात आली असल्यास संबंधित ठराव, कर्ज करार, मालमत्तेचे मूल्यांकन आणि तारण व्यवहाराची कायदेशीर स्थिती यांची स्वतंत्र तपासणी होणे आवश्यक आहे.

**आरोपांपेक्षा चौकशी महत्त्वाची**

कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांबाबत विविध प्रकारचे आरोप अथवा संशय व्यक्त होत असल्यास ते पुराव्याशिवाय सत्य मानणे योग्य ठरणार नाही. मात्र, आर्थिक व्यवहारांबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर संबंधित शासकीय यंत्रणांनी त्यांची वैधानिक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे गरजेचे आहे.

**आमदार भीमराव धोंडे यांची भूमिका स्पष्ट होणार का?**

एकीकडे मतदारसंघात दुष्काळसदृश परिस्थिती, दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, पशुपालकांसमोर चारा-पाण्याचे संकट आणि शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी असताना कडा सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी आमदार भीमराव धोंडे यांचा आग्रह नेमका कोणत्या अभ्यासाच्या आधारे आहे? असा सवाल उपस्थित होत आहे. कारखाना सुरू करण्यास विरोध करण्याचा प्रश्न नसून, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत हा निर्णय शेतकरी, पशुपालक, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा आहे का? याचे उत्तर देणे आवश्यक आहे. शासन, प्रशासन, कारखाना व्यवस्थापन आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी उपलब्ध ऊस, पाणी, आर्थिक व्यवहार्यता, कर्ज-तारण व्यवहार आणि संभाव्य आर्थिक जोखमीबाबत संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी. त्यानंतरच कारखाना सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांमधून होत आहे. दुष्काळात नागरिकांच्या घशाला पाणी आणि जनावरांना चारा मिळणे ही प्राथमिक गरज; त्यानंतरच कारखान्याचा विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६







# उसाला प्रति टन साडेपाच हजार द्या!

## स्वाभिमानीचे माजी खासदार राजू शेट्टी यांची मागणी

पुणे : यंदाच्या हंगामात तुटणाऱ्या उसाला प्रति टन साडेपाच हजार रुपये दर मिळावा,'' अशी एकमुखी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली. यापैकी कारखानदारांनी प्रति टन पाच हजार रुपये, तर केंद्र सरकारने अनुदानाच्या स्वरूपात प्रति टन ५०० रुपये द्यावेत, असे त्यांनी म्हटले आहे.

ऊस तुटल्यानंतर कारखान्यांनी तातडीने प्रति टन ४५०० रुपये द्यावेत आणि हंगाम संपताना पुन्हा ५०० रुपये द्यावेत. याव्यतिरिक्त केंद्र सरकारने प्रति टन ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. ही मागणी मान्य न झाल्यास साखर कारखान्यांची धुराडी पेटू देणार नाही, असा इशाराही शेट्टी यांनी दिला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जयसिंगपूर येथे आयोजित ऊस परिषदेत ते बोलत होते. सोमवारी (दि . १२) दिल्ली येथे होणाऱ्या बैठकीत साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा खरेदी दर प्रति लिटर ७० रुपये करण्याबाबत निर्णय झाला नाही, तर मंगळवारपासून (दि. १३) महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सर्व महामार्ग बेमुदत बंद ठेवणार असल्याचेही शेट्टी यांनी सांगितले. यासाठी



दोन्ही राज्यांतील शेतकऱ्यांनी कोगनोळी टोलनाक्यावर एकत्र जमावे, असे आवाहन त्यांनी केले. ऊस तोडणीला होणारा विलंब आणि वाहतुकीमुळे साखरेच्या उताऱ्यात घट होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्याची भरपाई म्हणून केंद्र व राज्य सरकारने ऊस उत्पादकांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे. तसेच १५ डिसेंबरनंतर तोडणी होणाऱ्या उसाला ठरलेल्या दरापेक्षा प्रति टन ३०० रुपये जादा दर मिळावा, अशी मागणीही त्यांनी केली. ''साखरेला प्रति किलो ५० रुपये हमीभाव द्यावा आणि इथेनॉलचा खरेदी दर प्रति लिटर ७० रुपये करावा; अन्यथा महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशातील शेतकरी साखर कारखान्यांना ऊस पुरवणार नाहीत,'' असा इशाराही शेट्टी यांनी दिला. साखरेचा किमान विक्री दर गेल्या आठ वर्षांपासून प्रति किलो ३१ रुपयांवर कायम आहे. दुसरीकडे उत्पादन खर्च वाढत असून, शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नाही. साखरेला प्रतिकिलो ५० रुपये हमीभाव दिल्यास सरकारवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. बाजारात साखरेचे दर प्रति किलो ५० रुपयांखाली जाणार नाहीत, याची हमी सरकारने द्यावी, असे ते म्हणाले. साखर कारखाने सुरू करण्याच्या घाईत शेतकऱ्यांचे आणि कारखान्यांचे नुकसान करू नका, असे आवाहनही त्यांनी ऊस उत्पादकांना केले. १५ नोव्हेंबरपूर्वी ऊस तोड घेऊ नका. काहीही न करता एकरी २२ ते २३ हजार रुपये जादा मिळत असतील, तर धीर धरा. घाईने ऊस तोड केल्यास साखरेचा उतारा कमी येईल. त्याचा परिणाम पुढील वर्षाच्या एफआरपीवर होईल, असे त्यांनी सांगितले.यंदा उसातील साखरेचा उतारा कमी असल्याने कारखाने सुरू करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे ऊस उत्पादकांनी घाईने कारखान्यांना ऊस पाठवू नये. तसेच पाण्याची उपलब्धता आणि संभाव्य उन्हाळ्याचा विचार करून नवीन ऊस लागणी टाळाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

## शेतकऱ्यांनो, प्रत्येक हंगामापूर्वी माती परीक्षण कराच !

आजकालच्या कृषी व्यवसायात शेतकऱ्यांसाठी माती ही फक्त जमीन नव्हे तर त्यांचा मुख्य वित्तीय आधार आहे. खरीप, रबी किंवा गळप हंगाम सुरू करण्यापूर्वी मातीच्या आरोग्याची तपासणी करणे हे शेतकऱ्यांचे बुद्धिमत्तेचे पाऊल आहे. यामुळे केवळ पैशाची बचत होते, पीक उत्पादन वाढते आणि शेतीचे भविष्य सुरक्षित होते. माती परीक्षण हे शेतकऱ्यांना पोषक तत्वांची, रोगजनक आणि ज्वालकांच्या प्रभावाबद्दल माहिती देते.

माती परीक्षण म्हणजे काय?

सामान्य शेतकऱ्यांकडून जाणीव असते की, माती सुधारण्यासाठी खत घेणे पुरेसे नाही. खरे कारण हे आहे की मातीच्या पोषक घटकांची उपलब्धता, पीएच मूल्य आणि इतर वैशिष्ट्ये वेगवेगळ्या भागात फरकतात. सॅम्पल घेऊन प्रयोगशाळेत तपासल्यास १२ मुख्य गोष्टी समजतात. यामुळे शेतकऱ्याला योग्य खते, जैवखते आणि पाणी व्यवस्थापनाचे निर्णय घेता येतात.

१. पोषक घटकांची योग्य उपलब्धता

माती परीक्षणात नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, सल्फर, जिंक, आयर्न इत्यादी घटकांची उपलब्धता पाहता येते. उदाहरणार्थ, रेडी मुळे किंवा चिकणमाती क्षेत्रात जिंकाची कमतरता जास्त असते. याबद्दल जाणीव असल्यास वाढीव खत टाळता येते आणि उत्पादन २०-३०% वाढते.

२. खर्चाची बचत

भारतात शेतकरी वारंवार रासायनिक खतांवर अवलंबून राहतात. माती परीक्षण न केल्यास अतिरिक्त खत खाणे, ज्यामुळे माती खराब होते आणि खर्च वाढतो. तपासणीनंतर योग्य प्रमाणात खत घेणे केवळ पैसे वाचवत नाही तर मातीची सुपीकता टिकवते.

३. पीक नियोजन आणि संभाव्य नुकसान टाळणे

शेतकऱ्यांना माहिती असते की त्यांच्या जमिनीला कोणते पीक फायदेशीर आहे. उदाहरणार्थ, पीएच मूल्य जास्त असल्यास कापूस किंवा तूर घेणे सोपे होते. यामुळे पीक नुकसान



टाळते आणि युनिफॉर्म उत्पादन मिळते.

४. माती सुधारणा आणि जैविक सुपीकता

माती परीक्षणात मातीच्या ज्वालक, रोगजनक आणि सेंद्रिय सामग्रीचा आढावा घेतला जातो. यानुसार जैवखत किंवा माती सुधारक (जसे की वर्मीकंपोस्ट) घेण्याची योजना आखता येते. यामुळे दीर्घकालीन सुपीकता टिकते आणि शेती शाश्वत होते.

५. सरकारी योजना आणि आधार

भारतात 'मृदा आरोग्यपत्रिका' योजना अंतर्गत प्रति शेतकऱ्याला मोफत तपासणी होते. त्यावर आधार घेऊन शासनाकडून जैवखत, बियाणे आणि कर्ज मिळते. यामुळे छोट्या शेतकऱ्यांना देखील आधुनिक कृषी करता येते.

६. मातीची दीर्घकालीन सुपीकता आणि पर्यावरण जाणीव

माती परीक्षण न केल्यास माती खराब होते, पाणी गुळते आणि पर्यावरणाला धोका निर्माण होतो. याबद्दल जाणीव असल्यास शेतकरी 'अमूल्य जमीन' वाचवण्यासाठी प्रयत्न करतात.

कसे करावे माती परीक्षण? : तालुक्यातील कृषी कार्यालय, बँक किंवा प्रयोगशाळेत (जसे की ऑक्सीफूड लॅब, यूबिक्सा टेस्टिंग) संपर्क साधा. शेतातून १०-१५ ठिकाणी सॅम्पल घ्या.

नमुना पाठवा, तपासणी फी द्या. आरोग्यपत्रिका घेऊन नाव नोंदवा आणि नियमित तपासणी करा. हंगाम सुरू करण्यापूर्वी माती परीक्षण हे केवळ एक चाचणी नाही, तर शेतकऱ्यांचे बुद्धिमान निर्णय आहे. ज्यामुळे खर्च कमी होतो, उत्पादन वाढते आणि माती चांगली राहते. आजच्या बाजारात प्रगती करायची असेल तर मातीला प्राधान्य द्या. शेतकरी साहेब, आपल्या मातीला जिवंत ठेवा आणि यशस्वी हंगाम घडवा!

## सरकारी मदत मिळवायची असेल तर शेतकऱ्यांनी ही कागदपत्रे तयार ठेवावीत

अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस किंवा कीड-रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास सरकारकडून तसेच पीक विमा कंपनीकडून आर्थिक मदत दिली जाते. ही मदत वेळेत आणि कोणत्याही अडचणीशिवाय मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडे सर्व आवश्यक कागदपत्रे योग्य आणि अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

१. आवश्यक कागदपत्रांची यादी

नुकसानभरपाईचा अर्ज करताना किंवा पंचनाम्याच्या वेळी खालील कागदपत्रे तयार ठेवावीत:

७/१२ उतारा (७/१२ ): चालू वर्षातील (नवीन) ७/१२ उतारा. त्यावर पिकाची नोंद (ई-पीक पाहणी) झालेली असणे आवश्यक आहे. ८-अ उतारा (८- ): जमिनीच्या मालकीचा पुरावा म्हणून ८-अ उतारा सोबत ठेवावा. आधार कार्ड ( ): शेतकऱ्याचे आधार कार्ड बँकेशी आणि मोबाईल क्रमांकाशी लिंक असावे. बँक पासबुकची प्रत: बँक खाते आधार कार्डशी लिंक असणे अनिवार्य आहे. पासबुकवर खाते क्रमांक, खातेदाराचे नाव आणि स्पष्ट दिसणे गरजेचे आहे. पीक विमा पावती: तुम्ही प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विमा भरला असल्यास त्याची पावती/फॉर्मची प्रत. ई-पीक पाहणी नोंद: मोबाईल ॲपद्वारे केलेल्या ई-पीक पाहणीची नोंदणी प्रत किंवा ७/१२ वरील पिकाची नोंद. नुकसान झालेल्या पिकांचे फोटो: शेतातील करपलेल्या किंवा पाण्याखाली गेलेल्या पिकांचे



स्पष्ट फोटो (शक्य असल्यास जिओ-टॅग फोटो). मोबाईल क्रमांक: आधार आणि बँकेशी लिंक असलेला चालू मोबाईल क्रमांक. २. नुकसानभरपाई मिळवण्यासाठी महत्त्वाची माहिती व सूचना ७२ तासांच्या आत पूर्वसूचना: नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत पीक विमा कंपनीला किंवा कृषी विभागाला माहिती देणे बंधनकारक असते. यासाठी विमा कंपनीचा टोल-फ्री क्रमांक, किंवा जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

पंचनामा: कृषी अधिकारी, महसूल अधिकारी (तलाठी) आणि विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत शेताचा पंचनामा होतो. पंचनाम्याच्या वेळी सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती तयार ठेवाव्यात आणि पंचनामा पत्रावर योग्य माहिती भरल्याची खात्री करूनच सही करावी.

सामायिक जमीन असल्यास: ७/१२ वर एकापेक्षा जास्त नाव असल्यास (सामायिक खातेदार), इतर खातेदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा संमतीपत्र लागू शकते. ३. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या टिप्स आधार व बँक खाते लिंक तपासा: अनेकदा रक्कम मंजूर होऊनही अयशस्वी होते. त्यामुळे तुमचे बँक खाते म्हणजेच आधार सिडिंग झालेले आहे की नाही, हे बँकेत जाऊन आधीच तपासून घ्या. कागदपत्रांमधील नावांची दुरुस्ती: आधार कार्ड, ७/१२ आणि बँक पासबुकवरील नावाच्या स्पेलिंगमध्ये तफावत नसावी. टीप: सर्व कागदपत्रांचा एक स्वतंत्र संच () तयार ठेवून त्याच्या २-३ झेरॉक्स प्रती आधीच काढून ठेवाव्यात, जेणेकरून पंचनाम्याच्या वेळी किंवा महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करताना अडचण येणार नाही.

## आडसाली उसाचे एकात्मिक खत व्यवस्थापन

उसाच्या वाढीमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात अन्नद्रव्ये. जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश यासहित सूक्ष्मअन्नद्रव्यांचा संतुलित प्रमाणात असणे उसाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय खते, रासायनिक खते आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर तज्ज्ञांनी शिफारस केलेल्या प्रमाणात करावा.

सेंद्रिय खते : सेंद्रिय कर्ब हा जमिनीच्या सुपीकतेचा मुख्य आधार अशतो. जमिनीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढवणे, माती भुसभुशीत ठेवणे, उपयुक्त सूक्ष्मजीवांची वाढ करणे, अन्नद्रव्यांची उपलब्धता आणि कार्यक्षमता वाढवण्यामध्ये सेंद्रिय पदार्थांची महत्त्वाची भूमिका असते. आडसाली ऊस लागवडीपूर्वी प्रति एकर किमान १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा ५ टन कंपोस्ट खत वापरावे. उपलब्धतेनुसार २ टन गांडूळ खत, २ टन कुजलेली प्रेसमड किंवा २ टन कोंबडी खताचाही वापर करता येतो. यासोबत ट्रायकोडर्मा, ॲझोटोबॅक्टर, पीएसबी आणि केएमबी यासारखी जैविक खते सेंद्रिय खतामध्ये मिसळून वापरल्यास मातीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर होतो.

आडसाली उसामध्ये खत व्यवस्थापन : आडसाली उसासाठी खत व्यवस्थापन करताना माती परीक्षण करुनच खत मात्रा देणे फायदेशीर ठरते. तरी रासायनिक खते देण्याचे तीन पर्याय आहेत. सरळ खतांमध्ये युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट



आणि म्युरेट ऑफ पोटॅश ही खते दिली जातात. तर मिश्र खतांमध्ये १०:२६:२६ आणि १९:१९:१९ यांचा वापर केला जातो. रासायनिक खतांमधून नत्र देताना लागणीवेळी १० टक्के, बाळबांधणीवेळी ४० टक्के, ९० दिवसांनी १० टक्के तर मोठी टक्के द्यावे. याशिवाय स्फुरद आणि पालाश देताना अर्धे लागणीच्या वेळी आणि अर्धे मोठी बांधणी करताना द्यावे. सरळ खते : लागणीच्या वेळी युरिया १ पोते ४.५ पोते सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३ पोते म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकर द्यावे. यानंतर बाळबांधणी करताना २.५ पोते युरिया द्यावे आणि लागणीनंतर ९० दिवसांनी १ पोते युरिया द्यावा. तर मोठी बांधणी करताना ३ पोते युरिया, ४.५ पोते सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३ पोते म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकर द्यावे

संयुक्त खते : मिश्र खतांमध्ये १०:२६:२६ आणि युरिया या खतांचा वापर केला जातो. यामध्ये लागणीच्या वेळी केवळ ५.५ पोते १०:२६:२६ द्यावे. बाळबांधणीच्या वेळेस ३ पोते युरिया आणि लागणीनंतर ९० दिवसांनी १ पोते युरिया पिकाला द्यावा. तसेच मोठी बांधणी करताना ५.५ पोते १०:२६:२६ आणि २ पोते युरिया द्यावा.

मिश्र खते/ संयुक्त खते : यामध्ये १९:१९:१९ या विद्राव्य खताचा वापर केला जातो. लागणीच्या वेळी २ पोते १९:१९:१९, २ पोते सिंगल सुपर फॉस्फेट आणि ०.५० पोते म्युरेट ऑफ पोटॅश वापरावे. बाळबांधणी करताना ३ पोते आणि लागणीनंतर ९० दिवसांनी १ पोते युरिया वापरावा. तर मोठी बांधणी करताना पुन्हा १९:१९:१९ चे २ पोते, युरियाचे २ पोते, सिंगल सुपर फॉस्फेटचे २ पोते आणि म्युरेट ऑफ पोटॅशचे ०.५० पोते प्रति एकर उसाला द्यावे. सूक्ष्मअन्नद्रव्यांचा वापर : आडसाली उसासाठी सूक्ष्म अन्नद्रव्ये जसे लोह, गंधक, जस्त, मँगेनीज, सोडियम, मॉलीब्डेनम, तांबे यांची गरज असते. प्रति एकरी सूक्ष्म अन्नद्रव्ये देताना फेरस सल्फेट १० किलो, झिंक सल्फेट ७ किलो, मँगेनीज सल्फेट १० किलो, बोरॅक्स २ किलो, सोडियम मॉलीब्डेट १ किलो आणि कॉपर सल्फेट ५ किलो द्यावे. उसाच्या लागवडीवेळी २४ किलो प्रति एकर मूलद्रवी गंधक तसेच सिलिकॉनसाठी १६० किलो सिलिकॉन बगॅसची राख आणि १ लिटर सिलिकॉन उपलब्ध करुन देणारे जिवाणू द्यावे.




### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : ॲडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड होंड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस ॲक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डानेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा ॲटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ ५



# राज्यातील १२५ आरोग्य संस्थांचे आरोग्य संवाद यात्रेदरम्यान लोकार्पण

## नागपूर, ठाणे, पालघर, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा, अमरावती, नाशिक, आणि कोकणातील आरोग्यसेवेला बळकटी

मुंबई। प्रतिनिधी

०१ नोव्हेंबर ते ०५ डिसेंबर पर्यंत होणाऱ्या ''आरोग्य संवाद यात्रे'' दरम्यान राज्यातील सुमारे १२५ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाचे वतीने १५ ऑगस्ट २६ रोजी राज्यातील पहिल्या टप्प्यातील १२४ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात आले होते. आरोग्याच्या पायाभूत सुविधा बळकट करून, महाराष्ट्राला आरोग्य संपन्न बनवण्याच्या दिशेने दुसऱ्या टप्प्यातील आरोग्य संस्थांचे लोकार्पण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राज्यातील नागरिकांना त्यांच्या गावाजवळ, घराजवळ उत्तम दर्जेदार व तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देत ''आरोग्य संपन्न महाराष्ट्र' घडवण्याच्या प्रक्रियेत हा दुसरा टप्पा महत्त्वाचा मानला जात असुन, आगामी काळात राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील आणखी २५० आरोग्य संस्था नागरिकांच्या सेवेत रुजू करण्याचा दृष्टीने युद्धपातळीवर कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व आरोग्य संस्थांची बांधकामे, मनुष्यबळ, वैद्यकीय उपकरणे, फर्निचर, विज,पाणी जोडणी व इतर आवश्यक पायाभूत सुविधाबाबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा घेतला. सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त श्री.संजय काटकर, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बापू पवार, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा कक्षाचे कार्यकारी अभियंता, संबंधित विभागांचे उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व परिमंडळातील उपसंचालक, राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक तसेच संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे या बैठकीला उपस्थित होते. आरोग्य संस्थांचे बांधकाम पूर्णत्वास येत असतानाच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विभागाच्या निर्णयामुळे अल्प काळात दुसऱ्या टप्प्यातील नागपूर, अमरावती, संभाजीनगर, नाशिक,पुणे, ठाणे,पालघर, सातारा व कोकण विभागातील १२५ आरोग्य सुविधा नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज होत आहेत. यामध्ये उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालय, प्रशिक्षण संस्था अशा विविध आरोग्य संस्थाचा समावेश आहे. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. अपघातग्रस्त, माता-बालक, ज्येष्ठ नागरिक, तसेच आपत्कालीन रुग्णांना स्थानिक स्तरावरच अधिक गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर उपचार मिळणार आहेत. याचबरोबर आरोग्य कर्मचाऱ्यांनाही अधिक सुसज्ज कार्यपरिसर उपलब्ध होणार आहे. याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने आरोग्य सेवा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. ''सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा'' हे राज्य शासनाचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साकार करण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

# माजलगाव जलाशयातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर संयुक्त पथकाची मोठी कारवाई

## ३५० मोटारी व ५० सोलर पॅनेल हटवले



बीड। प्रतिनिधी

माजलगाव जलाशयातून मंगरूळ १ आणि मंगरूळ २ या ठिकाणी होत असलेल्या अवैध पाणी उपशाविरोधात १० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून मोठी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत अवैध पाणी उपसा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तब्बल ३५० पाण्याच्या मोटारी आणि ५० सोलर पॅनेल काढून टाकण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक पावलामुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईदरम्यान संबंधित शेतकरी आणि ग्रामस्थांना प्रशासनाकडून सक्त ताकीद देण्यात आली असून, त्यांच्याकडून यापुढे जलाशयातून कोणत्याही प्रकारचा अवैध पाणी उपसा करणार नसल्याचे लेखी आश्वासन लिहून घेण्यात आले आहे. पाण्याचे महत्व आणि धरणातील पाणीसाठा लक्षात घेता ही कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहणार नाही. भविष्यात पुन्हा अवैध पाणी उपसा सुरू होऊ नये यासाठी यापुढेही अशीच सातत्याने कारवाई चालू राहील, असा स्पष्ट इशारा पाटबंधारे विभागाकडून देण्यात आला आहे.

ही व्यापक कारवाई माजलगाव धरण प्रशासन, पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, पोलीस दल आणि विद्युत वितरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली. या धडक मोहिमेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शितल माने, एस. एस. शेख, मधुकर जाधव, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी हंगे, पोलीस पाटील अल्ताफ शेख, पोलीस दलाचे उपनिरीक्षक (पीएसआय), विद्युत वितरण विभागाचे एस. बी. चव्हाण यांच्यासह ग्रामसेवक तसेच सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने आणि सक्रियपणे सहभागी झाले होते.

# आकाशाला गवसणी घालण्यासाठी बीडच्या तरुणींना नवी दिशा!

## इंडिगोच्या 'गिव्हिंग विंग्स टू फ्लाय' उपक्रमांतर्गत व्यावसायिक वैमानिक होण्यासाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

बीड। प्रतिनिधी

आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बीड जिल्ह्यातील तरुणींना व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याची दिशा देणारा ' ' हा करिअर मार्गदर्शन कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी (नियोजन भवन) सभागृहात उत्साहात पार पडला. बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने इंडिगोच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आणि 'भारत केअर्स'च्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमास सुरुवात झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने आयोजित हा कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न झाला.या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकृष्ण इघारे, सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, मिलिया महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सीमा हाश्मी, मुख्यमंत्री फेलो तेजश्री वावरे आणि प्रतीक मखीजा यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी कार्यक्रमास उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




'भारत केअर्स'चे प्रकल्प व्यवस्थापक कल्पेश मोहोड आणि मास्टर ट्रेनर रुपेश गाडेकर यांनी उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधी, व्यावसायिक वैमानिक होण्यासाठीची पात्रता, प्रशिक्षण आणि निवड प्रक्रिया याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पारंपरिक करिअरच्या पर्यायांबरोबरच विमान वाहतूक क्षेत्रातील संधींचाही विचार करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. निवड झालेल्या पात्र विद्यार्थिनींना कमर्शियल पायलट होण्यासाठी मोफत प्रशिक्षण व साहाय्य दिले जाणार आहे.या उपक्रमासाठी अर्ज करणारी उमेदवार भारतीय नागरिक असलेली महिला असावी. तिचे वय १ मे २०२६ रोजी १८ ते ३५ वर्षे दरम्यान असणे आवश्यक आहे. उमेदवाराने इयत्ता बारावी इंग्रजी, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांसह उत्तीर्ण केलेली असावी, तसेच बारावीत प्रत्येक विषयात किमान ५१ टक्के गुण मिळवलेले असावेत. उमेदवाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹८,००,००० (आठ लाख रुपये) पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी पायलट प्रशिक्षण, अभ्यासक्रम, पात्रता आणि विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे त्यांच्या शंकांचे निरसन झाले. या संवादातून विमान वाहतूक क्षेत्रातील संधी, आवश्यक तयारी आणि उज्ज्वल करिअरच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली.'गिव्हिंग विंग्स टू फ्लाय' उपक्रमाच्या दुसऱ्या बॅचसाठी अर्ज रोलिंग पद्धतीने स्वीकारले जात असून, पूर्ण अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर आहे. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र व होतकरू विद्यार्थिनींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शाळा चालवणे म्हणजे धर्मादाय कार्य नव्हे'

## उच्च न्यायालयाचा शिक्षण संस्थेला दणका, मालमत्ता कर सवलतीची याचिका फेटाळली

जालना। प्रतिनिधी

केवळ शैक्षणिक संस्था चालवणे किंवा भाषिक अल्पसंख्याक दर्जा असणे म्हणजे आपोआप मालमत्ता करातून सवलत मिळण्याचा अधिकार निर्माण होत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. जय हिंद सिंधू एज्युकेशन ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र शासन (रिट याचिका क्रमांक ९८७/२०१२) या प्रकरणात निकाल देताना न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने संस्थेची मालमत्ता कर सवलतीची मागणी फेटाळून लावली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आकारलेल्या मालमत्ता कराच्या नोटिसांना आव्हान देणारी ही याचिका होती.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १३२ अंतर्गत जर एखाद्या संस्थेला मालमत्ता कर सवलत हवी असेल, तर तिच्या इमारती व जागा केवळ आणि केवळ सार्वजनिक परोपकारी किंवा धर्मादाय कामासाठीच वापरल्या जातात हे संस्थेला प्रत्येक आर्थिक वर्षात स्वतंत्रपणे सिद्ध करावे लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निवाड्यांचा संदर्भ देत खंडपीठाने नमूद केले की, शिक्षणाचा उद्देश धर्मादाय ठरण्यासाठी त्यात लोककल्याण किंवा परोपकाराचा प्रत्यक्ष अंश असणे आवश्यक आहे; जर संस्था व्यावसायिक तत्त्वावर चालत असेल, शुल्क व देणग्या स्वीकारत असेल आणि विनामूल्य शिक्षण देत नसेल, तर तिला धर्मादाय ठरवून करमुक्ती देता येणार नाही. तसेच अशी कर सवलत कायमस्वरूपी अथवा ठोक स्वरूपात मागता येत नसून संस्थेला दरवर्षी सवलतीचा दावा दाखल करून निकष पूर्ण करावे लागतात. संबंधित संस्था अशा अटींची पूर्तता करण्यात अपयशी ठरल्याने न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार देत याचिका फेटाळली. या निकालाचे स्वागत करताना विधीज्ञ ॲड. महेश धनावत यांनी प्रतिक्रिया दिली की, उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत दिशादर्शक आणि वास्तववादी असून शिक्षण क्षेत्रात केवळ नफेखोरी न करता शाळांनी खऱ्या अर्थाने पुढे येऊन समाजासाठी परोपकारी व सेवाभावी कार्य करणे गरजेचे आहे, संस्थांनी गोरगरीब व गरजू घटकांना निःशुल्क सेवा देऊन परोपकाराचा आदर्श निर्माण केला तरच त्यांना अशा सवलतींचा नैतिक व कायदेशीर अधिकार पोहोचतो.

# जिल्हा परिषद प्रशालेच्या काम निकृष्ट असल्याचा आरोप ; चौकशी करून काम थांबविण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात असलेल्या अंगणवाडी इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम सध्या सुरू असून, या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. इमारतीची दुरुस्ती, रंगरंगोटी आदी कामे सुरू असली तरी प्रत्यक्ष कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.अंगणवाडी केंद्रात लहान बालकांचे शिक्षण व विविध उपक्रम घेतले जात असल्याने इमारतीच्या दुरुस्तीचे काम दर्जेदार आणि सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, सुरू असलेल्या कामात आवश्यक तांत्रिक निकष व गुणवत्तेची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती केवळ रंगरंगोटीपुरती मर्यादित न ठेवता इमारतीची भिंत, छत, फरशी, दरवाजे-खिडक्या तसेच इतर आवश्यक भागांची मजबुती आणि सुरक्षितता तपासणे गरजेचे आहे. निकृष्ट कामामुळे भविष्यात इमारतीच्या वापरादरम्यान बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेल्या कामाची गुणवत्ता तपासावी, कामाचे अंदाजपत्रक व मंजूर निकषांनुसार काम होत आहे की नाही, याची पडताळणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामाला स्थगिती देऊन निकृष्ट काम आढळल्यास संबंधित एजन्सीवर नियमानुसार कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.काम निकृष्ट असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित एजन्सीवर कारवाई करून आवश्यकतेनुसार तिच्यावर निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याबाबत नियमानुसार निर्बंध घालावेत. तसेच नव्याने निविदा प्रक्रिया राबवून गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या पात्र एजन्सीमार्फत अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# मयूर शिरसाट याची एनडीए सैन्यदलात निवड

पाथर्डी । प्रतिनिधी

भारतीय सैन्यदलातील सुभेदार ज्ञानदेव शंकर शिरसाट यांचे चिरंजीव मयूर ज्ञानदेव शिरसाट याने आपल्या प्रचंड जिद्द चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर नॅशनल डिफेन्स अकॅडमी ()च्या निवड प्रक्रियेत यश संपादन करून भारतीय सैन्यदलातील अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले आहे मयूरने गेल्या वर्षीही एनडीएची परीक्षा दिली होती.



मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे त्यावेळी त्याची निवड होऊ शकली नव्हती परंतु या अपयशाने खचून न जाता कोणतीही निराशा मनात न बाळगता त्याने पुन्हा नव्या उमेदीने दुप्पट मेहनतीने प्रचंड आत्मविश्वासाने प्रयत्न सुरू ठेवले कारण त्याला केवळ परीक्षा उत्तीर्ण व्हायची नव्हती तर आपल्या आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवायचे होते आणि अखेर त्याने आपल्या कष्टाच्या जिद्दीच्या चिकाटीच्या व अभ्यासात सातत्य ठेवून या जोरावर ते स्वप्न पूर्ण करून दाखवले आहे मुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून आई-वडिलांनी आयुष्यभर कष्ट करावेत आणि त्या कष्टांचे चीज मुलाने स्वतःच्या कर्तृत्वाने करून दाखवावे यापेक्षा मोठा आनंद अभिमान आई-वडिलांसाठी दुसरा नाही याचे प्रत्यक्ष उदाहरण पाथर्डी तालुक्यातील शिरसाटवाडी येथील मयूर शिरसाट होय मयूर शिरसाट याने पाथर्डी तालुक्यातील कष्टकरी ऊसतोड मजूर व गोरगरीब शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांना एक संदेश दिला आहे की तो म्हणजे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म पासून दूर राहून केवळ शालेय व कॉलेज जीवनात जिद्द मेहनत कष्ट व सातत्याने अभ्यास व स्पर्धा परीक्षेचे तयारी करून कुठल्याही शासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न प्रत्येक युवकाने जिवंत ठेवले पाहिजे जोपर्यंत ते साध्य होत नाही हीच खरी संत भगवानबाबांची शिकवण आहे यामुळे आज महाराष्ट्रात पाथर्डी तालुका ऊसतोडणी मजुरांचा तालुका म्हणून ओळखला जायचा तो आता शासकीय अधिकाऱ्यांचा तालुका म्हणून ओळखला जात आहे.

# गुरुवारपासून 'समृद्धी'चे दोन्ही युनिट सुरू करणार गाळप

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ८०० ऊसतोड टोळ्यांची यंत्रणा सज्ज; दुष्काळात शेतकऱ्यांना बळ: प्रति टनामागे ३०० रुपयांचे वाढीव अनुदान!

जालना । प्रतिनिधी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मराठवाड्यात उच्चांकी दर देणारा समृद्धी कारखाना युनिट नंबर २ सह आगामी गाळप हंगामासाठी सज्ज झाला असून १५ ऑक्टोबर २०२६ पासून समृद्धी युनिट १ आणि २ चे गाळप सुरू होणार आहे. दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन कारखान्याने ७५० ते ८०० टोळ्यांची यंत्रणा उभी केली असून १०० ते १२० दिवसांत कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासोबतच कारखाना प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ठरणाऱ्या दराव्यतिरिक्त प्रति टनामागे ३०० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी केली आहे.



यंदा राज्यात सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने ऊस उत्पादक शेतकरी पाणीटंचाईला सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत समृद्धी कारखान्याने गाळप हंगाम २०२६-२७ साठी शेतकरी हित समोर ठेवून पाण्याअभावी वाळत असलेल्या शेतकऱ्यांचा ऊस प्राधान्याने तोडण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी ७५० ते ८०० ऊसतोड टोळ्यांची यंत्रणा सज्ज केली आहे. समृद्धी साखर कारखान्याने युनिट नंबर २ सुरू करून आपली गाळप क्षमता वाढवली आहे. त्यामुळे यंदा युनिट १ व २ मिळून १२ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. सर्व शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप होणार असल्याने शेतकऱ्यांनी ऊसतोडीची घाई करू नये, समृद्धी कारखाना प्रत्येक गावात ऊसतोड यंत्रणा उपलब्ध करून देणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे.

दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३०० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय समृद्धी कारखान्याने घेतला आहे. शेतकऱ्यांनी प्रोग्रॅम येऊनही आपला ऊस मुदतीनंतर गाळप केल्यास अशा शेतकऱ्यांना या अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे. यामध्ये १ ते १५ जानेवारीदरम्यान ऊस गाळप झालेल्या शेतकऱ्यांना ५० रुपये प्रति मे. टन, १५ ते ३० जानेवारीदरम्यान १०० रुपये आणि १ ते १५ फेब्रुवारीदरम्यान गाळप झालेल्या उसाला २०० रुपये आणि १५ ते २८ फेब्रुवारीदरम्यानच्या उसासाठी ३०० रुपये प्रति मे. टनप्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे, अशा शेतकऱ्यांनी या प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कारखान्याने केले आहे. दुष्काळी संकटामुळे आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिवाळी सणासाठी १०० रुपये प्रति मे. टनप्रमाणे वाढीव हप्ता देण्याचा निर्णय कारखान्याने घेतला आहे. विशेष म्हणजे हा अंतिम हप्ता नसून दिवाळीनंतर अंतिम हप्ता जाहीर करण्यात येणार असल्याचे सतीश घाटगे यांनी स्पष्ट केले आहे. गाळप हंगाम २०२५-२६ च्या उसाला पहिला हप्ता २८००, दुसरा हप्ता १०० असे आतापर्यंत २९०० रुपये प्रति मे. टनप्रमाणे रक्कम देण्यात आली आहे. त्यात १०० रुपयांचा तिसरा वाढीव हप्ता दिवाळीत देण्यात येणार असून त्यानंतर अंतिम दराची घोषणा होणार आहे.

दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत असल्याने समृद्धीचे युनिट नंबर १ व २ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांचा ऊस पाण्याअभावी जळून जात आहे त्यांनी विनाविलंब तोड दिली जाईल. मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेता शेतकऱ्यांनी बाहेरील कारखान्यांना ऊस न देता आपल्या भागातील कारखान्यांनाच द्यावा, असे आवाहन माझे शेतकऱ्यांना राहील. तसेच शेतकऱ्यांनी हार्वेस्टरऐवजी मजुरांच्या टोळीकडून ऊसतोड करावी जेणेकरून शेतकऱ्यांच्या जनावरांना सहज चारा उपलब्ध होईल.

सतीश घाटगे पाटील, (चेअरमन, समृद्धी साखर कारखाना)

# बीड जिल्ह्यात मग्रारोहयोचे २००० मजूर बोगस असल्याचा संशय

## रोहयो मंत्रालयाकडूनही या संशयाला दुजोरा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना कामासाठी लागणारे नोंदणीकृत मजूर बोगस असल्याचा संशय व्यक्त केला जात असून ही संख्या जवळपास दोन हजारावर आहे. या संशयाला रोजगार हमी योजनेच्या मंत्रालयातूनही दूजोरा मिळत असून या प्रकरणाची ही भविष्यात चौकशी होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात रोजगार हमीची कामे सुरू करून मजुरांना काम मिळावे या हेतूने ही योजना केंद्रस्तरावर सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस मजुरांची नोंद करण्यात आआल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या मजुरांच्या यादीतील अनेक जण मयत , काहीजण सरकारी नोकरी करणारे तर काहीजण स्थलांतरित आहेत. जे लोक मजुरी करू शकत नाहीत असे विद्यार्थी आणि वयोवृद्धांचाही यात भरणा आहे. अनेक जण खाजगी क्षेत्रात नोकरी करतात. मात्र आपल्या गावामध्ये मजुरांच्या यादीत त्यांचे नाव आहे. या नावावर मस्टर भरून हे पैसे खात्यावर टाकले जातात आणि नंतर ते पैसे उचलून घेतले जातात काही ठिकाणी तर परस्पर खाते उघडून आणि त्यांचे एटीएम घेऊन परस्पर पैसे उचलून घेतल्याच्याही तक्रारी आहेत. गेल्या अनेक दिवसापासून हा उद्योग चालू असून गावामध्ये मजुरांची संख्या मोठी असली तरी प्रत्यक्ष कामाला मात्र मजूर नसतात. ग्रामीण भागामध्ये मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने ही योजना सुरू झाली. मात्र त्याचा गैरफायदा घेतला जात असून प्रत्यक्ष कामावर मजूर येत नाहीत ते इतर ठिकाणी काम करत असतात. मात्र त्यांच्या नावावर मोठ्या प्रमाणात पैसे उचलले जात आहेत. काही ठिकाणी या पैशाचा लाभ थेट मजुरांना होतो. काम न करता ही त्यांना पैसे मिळतात तर काही ठिकाणी हे पैसे परस्पर उचलून घेतले जातात. असे अनेक प्रकार जिल्ह्यात घडत आहेत. रोजगार हमी मंत्रालयाने याची माहिती घेतली असता जवळपास २००० मजूर बोगस असल्याचा संशय व्यक्त केला आहे. या मजुराची पडताळणी करून भविष्यात योग्य व्यक्तीच मजूर म्हणून राहतील अशी तरतूद भविष्यात करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सध्या तरी मोठ्या प्रमाणात या मजुरी प्रकरणामुळे राज्य आणि केंद्र स्तरावर जिल्ह्याची बदनामी होत असून मध्यंतरीच्या काळात नवीन योजनेला शासनाने पैसे दिल्याने मग्रारोहयो योजनेतून क्रियेट झालेले एफटीओ डिलीट करून हे एफटीओ नवीन बीव्हीजी रामजी या योजनेतून क्रियेट करण्यात आले. याची माहिती जिल्हा प्रशासनाला मिळताच या प्रकरणाची चौकशी समिती नेमुन चौकशी सुरू झाली. मात्र या चौकशीला रोहयो मंत्री भारत सेठ गोगावले यांनी तात्पुरती स्थगिती देण्यास सांगितले होते. मात्र प्रशासन स्तरावर ही चौकशी सुरूच असून नेमकी कोणाकोणाची चौकशी होते हे येणाऱ्या काळात कळेलच वास्तविक पाहता अनेक कार्यकर्त्यांनी आपले पैसे लवकर मिळावेत या हेतूने हे उद्योग केले मात्र आता त्यांना पैसे मिळताना केंद्राचे मार्गदर्शन घ्यावे लागेल. असे रोहयो मंत्री भारत सेठ गोगावले यांनी स्पष्ट केले. त्यांना पैसे मिळण्याची घाई होती त्यांची तक्रार झाल्याने अडचण झाली असून आता हे पैसे लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. आता जून पासून नवीन जी – रामजी योजना सुरू झाली असून आता वैयक्तिक लाभाची कामे आणि सार्वजनिक कामे याच नव्या योजनेनुसार केली जातील. याला शासनाने आर्थिक तरतूदही केली असून जवळपास चार हजार कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळाल्याचे रोहयो मंत्री गोगावले यांनी सांगितले. विशेष म्हणजे जी कामे आता पूर्ण झाली आहेत. त्या जुन्या मग्रा रोहयो योजनेसाठी एकही रुपया तरतूद करण्यात आली नाही. जी कामे पूर्ण झाली आहेत. त्यांच्यासाठी अगोदर पैसे देणे गरजेचे असतानाही शासनाने यासाठी पैसे दिले नाहीत. मात्र नवीन योजनेची कामेही अद्याप सुरू नाहीत तरी त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून जुन्या रोजगार हमी योजनेची तीन वर्षापासून रखडलेली बिले अगोदर द्यावीत अशी मागणी आहे.यावर सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यामध्ये सार्वजनिक कामासह विहीर, घरकुल आदी वैयक्तिक लाभाच्या योजनांचे पैसेही अडकून पडले आहेत. हे पैसे वेळेत मिळाले नाहीत तर मराठवाड्यात उद्रेक होण्याची शक्यता ही वर्तवली जात आहे.

### नव्या योजनेसाठी पैसे, मात्र जुन्या योजनेसाठी छदामही नाही

नवीन जी– रामजी योजनेसाठी सरकारने केंद्र आणि राज्य मिळून ७०००कोटींपेक्षा अधिक रकमेची तरतूद केली आहे. मात्र जुन्या योजनेची तीन हजार सातशे कोटी रुपये अद्याप बाकी आहेत. गेल्या तीन वर्षापासून ही बिले रखडलेली असून सरकारने या योजनेतील झालेल्या कामाची बिले देणे गरजेचे होते. मात्र ती बिल देण्यात न आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. नवीन योजनेची अद्याप कामेही सुरू नाहीत त्यामुळे त्या त्यासाठी लगेच तरतुदीची गरज नव्हती अशीही तीव्र प्रतिक्रिया मराठवाड्यातून ऐकायला मिळत आहे.

# नगरनाका परिसरातून सव्वा लाखांच्या विदेशी दारूसह एकास पकडले

## राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र मूग गिळून गप्प



बीड । प्रतिनिधी

शहरातील अवैध धंद्यांवर व दारू विक्रीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी मोहीम तीव्र केली असून, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने नगर नाका परिसरात मोठी कारवाई केली आहे. मेडोस स्पा लगतच्या गल्लीत सापळा रचून विनापरवाना अवैध विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमाला रंगेहात पकडण्यात आले असून, त्याच्याकडून दारू व दुचाकीसह एकूण १ लाख ११ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, बीड शहरातील अवैध दारू विक्री व धंद्यांवर प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले होते. या पार्श्वभूमीवर अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत होते.

दिनांक ९ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास नगर नाका भागात गस्त सुरू असताना एका इसमाकडून दुचाकीवरून विदेशी दारूची चोरटी वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष मेडोस स्पाच्या बाजूच्या गल्लीत सापळा लावला. काही वेळातच संशयित इसम बजाज कंपनीच्या दुचाकीवरून ◀◀ पान ३ वर

# शिवाजीनगर पोलिसांची कारवाई: पाच वर्षापासून फरार दोन आरोपींना बेड्या

बीड । प्रतिनिधी

गेल्या पाच वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या दोन फरार आरोपींचा छडा लावून शिवाजीनगर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई आज, ११ ऑक्टोबर रोजी गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आली.





याबाबत अधिक माहिती अशी की, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु.र.नं. ३०/२०२१, कलम ३२६, ३२३, ५०४, ३४ भादंवि अन्वये दाखल गुन्ह्यातील पाहिजे असलेले आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार झाले होते. या फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक सातत्याने प्रयत्नरत होते.

दरम्यान, आरोपींचा शोध सुरू असताना पोलीस पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ◀◀ पान ३ वर

# नवरात्रोत्सवात ज्योत घेऊन येणाऱ्या देवीभक्तांचे आमदार सुरेश धस यांच्या वतीने स्वागत!

आष्टी । प्रतिनिधी

नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूरच्या आई तुळजाभवानी मातेची पवित्र ज्योत घेऊन जाणाऱ्या देवीभक्तांच्या सेवेसाठी लोकनेते आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानाशेजारी चहा, बिस्किटे आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था करण्यात आली होती. ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच भक्तसेवेची भावना जपण्यात आली.





अद्वैतचंद्र निवासस्थानाशेजारी चहा, बिस्किटे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था; भक्तांच्या सेवेसाठी लोकप्रतिनिधींचा पुढाकार

नवरात्रोत्सवाच्या काळात तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी आणि पवित्र ज्योत घेऊन जाण्यासाठी विविध भागांतून भाविक मोठ्या श्रद्धेने प्रवास करतात. या प्रवासादरम्यान भक्तांना थोडा विसावा मिळावा, त्यांची तहान–भूक भागावी आणि त्यांचा प्रवास सुखकर व्हावा, या भावनेतून ही व्यवस्था करण्यात आली. भाविकांचे स्वागत करत त्यांना चहा, बिस्किटे व पाणी देण्यात आले. यावेळी आमदार सुरेश आण्णा धस, नगराध्यक्ष जिया बेग, ◀◀ पान ३ वर

# आष्टी पोलिसांची मोठी कारवाई! तीन वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर जेरबंद

## आष्टी पोलिसांच्या पथकाला यश; खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यात यशस्वी कारवाई

आष्टी । प्रतिनिधी

खुनाच्या गुन्ह्यातील गेल्या तीन वर्षांपासून फरार असलेल्या पाहिजे असलेला आरोपीला अखेर जेरबंद करण्यात आष्टी पोलिसांना यश आले आहे. आष्टी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईमुळे गंभीर गुन्ह्यांतील फरार आरोपींचा शोध घेण्याच्या पोलिसांच्या मोहिमेला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.

आष्टी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ५२९/२०२३ मध्ये भारतीय दंड विधान कलम ३०२ व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद आहे. या प्रकरणातील उद्धव आप्पासाहेब काळे (वय ६० वर्षे, रा. वाकी, ता. आष्टी, जि. बीड) हा आरोपी मागील काही वर्षांपासून फरार होता.

आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत संबंधित आरोपी आपल्या राहत्या घरी आल्याची माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तातडीने पथक रवाना केले. पथकाने आरोपीच्या राहत्या घरी जाऊन शोध घेतला असता तो मिळून आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवीनचंद्र कावत यांच्या तसेच अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रभारी अधिकारी भारत पांढरे, सपोनि नाना सूर्यवंशी, पोलीस हवालदार नंदकिशोर सवाने, अमोल नवले, भास्कर आहेर, पोलीस नाईक गणेश भुतेकर, पोलीस कॉन्स्टेबल सचिन पवळ आणि प्रभाकर खोले यांनी या कारवाईत सहभाग घेतला.फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी आष्टी पोलिसांकडून सुरू असलेल्या प्रयत्नांना या कारवाईमुळे यश मिळाले असून, गंभीर गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांनी दाखवलेली तत्परता अधोरेखित झाली आहे.

# दिल्लीतील सौंदर्य स्पर्धेत बीडच्या ईशा गायकवाड हिने पटकावला 'प्राईड मिस इंडिया २ रा रनर अप'चा बहुमान





बीड । प्रतिनिधी

नवी दिल्लीतील 'विवंता बाय ताज' हॉटेलमध्ये पार पडलेल्या प्रतिष्ठित 'डीके पेजेंट – प्राईड ऑफ इंडिया २०२६' या राष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत बीडची सुकन्या ईशा वसंतराव गायकवाड हिने घवघवीत यश मिळवले आहे.

देशभरातून आलेल्या शेकडो स्पर्धकांमधून आपल्या कौशल्याच्या जोरावर तिने 'प्राईड मिस इंडिया २०२६ – २ री रनर अप' हा मानाचा किताब पटकावला. तिच्या या यशाने संपूर्ण बीड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे. डॉ. जिमी गरिमा आणि पुष्पांजली तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत रॅम्प वॉक, टॅलेंट राऊंड, पर्सनॅलिटी टेस्ट आणि बुद्धिमत्ता कसणाऱ्या प्रश्नोत्तरांच्या फेऱ्यांचा समावेश होता. ईशा गायकवाड हिने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने आणि आत्मविश्वासाने परीक्षकांची मने जिंकली. ईशाचे प्राथमीक शिक्षण बीड येथील तुलसी इंग्लीश स्कुल येथे झाले , ईशा सध्या संभाजीनगर मध्ये एमजीएम महाविद्यालयात फिजोथेरीपी करीत आहे. तिच्या या यशाबद्दल वडील वसंतराव गायकवाड, आई प्रज्ञा यांच्यासह नातेवाईक, महाविद्यालयातील प्राध्यापक व मित्रपरिवाराने अभिनंदन केले आहे.

# शनि अमावस्येनिमित्त मच्छिंद्रनाथ गडावर नाथभक्तांचा महापूर

## 'अलख निरंजन'च्या जयघोषाने मायंबा नगरी दुमदुमली!

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव (मायंबा) येथील गर्भगिरीच्या निसर्गरम्य पर्वत रांगेत विसावलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर शनि अमावस्येनिमित्त भाविकांची अभूतपूर्व मांदियाळी पाहायला मिळाली. जगातील एकमेव संजीवन समाधी असलेल्या या पवित्र स्थळी दर्शनासाठी महाराष्ट्रासह परराज्यातून लाखो नाथभक्तांनी हजेरी लावली होती. शनिवारी पहाटेपासूनच सुरू झालेल्या भक्तांच्या गर्दीने संपूर्ण गड परिसर गजबजून गेला होता.



शनि अमावस्येचे विशेष महत्त्व असल्याने गडावर शुक्रवारी रात्रीपासूनच भाविक दाखल होण्यास सुरुवात झाली होती. शनिवारी पहाटे महापूजा आणि आरती झाल्यानंतर 'अलख निरंजन', बडे बाबा की जय' अशा जयघोषाने संपूर्ण मायंबा नगरी दुमदुमून गेली होती. नवनाथ संप्रदायाचे आद्यगुरू मच्छिंद्रनाथ यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन धन्य झाल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली.

दर अमावस्येला येथे हजारो भाविक येतात, मात्र शनि अमावस्येचे औचित्य असल्याने ही गर्दी लाखांच्या घरात पोहोचली होती. भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी देवस्थान ट्रस्ट ,स्वयंसेवक आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख नियोजन करण्यात आले होते. पिण्याचे पाणी, सावलीसाठी मंडप, आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवांची चोख व्यवस्था करण्यात आली होती. तसेच, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. मच्छिंद्रनाथ गडाचा कायापालट करण्यासाठी आणि येथे येणाऱ्या देशभरातील भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात विविध भव्य विकासकामे वेगाने सुरू आहेत. भक्तनिवास, सुसज्ज रस्ते, घाट आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामांमुळे गडाचे वैभव अधिकच वाढणार असून, या नियोबद्ध विकासकामांबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.

दिवसभर चाललेल्या या धार्मिक उत्सवात महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले. भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात हा शनि अमावस्या सोहळा अत्यंत शांततेत व उत्साहात पार पडला.

# घटस्थापनेने वडवणीच्या रेणुकामातेचा शारदीय नवरात्रोत्सव प्रारंभ

## भाविकांच्या रेलचेलने मंदिर परिसर फुलला भक्ती, श्रध्दा आणि उत्साहाचा अमूल्य संगम

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक–भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. काल रविवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. सकाळीच रेणुका मातेची विधीवत पूजाअर्चा करुन घटस्थापना करण्यात आली.





या मंदिर परिसरामध्ये पहिल्या दिवशीच सकाळीपासून भाविकांची दर्शनासाठी रेलचेल दिसून आली. यावेळी भाविकांच्या उपस्थितीने मंदिर परिसर फुलून गजबजला होता.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक–भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावर्षीचा नवरात्र महोत्सव काल दि.११ ऑक्टोबर २०२६ रविवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी ◀◀ पान ३ वर

# शाहूनगरमधील महालक्ष्मी माता मंदिरात भरगच्च धार्मिक कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

शहरातील शाहूनगर भागातील महालक्ष्मी माता मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आणि शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून महालक्ष्मी माता मंदिर संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे ह.भ.प. गुरुवर्य भागवताचार्य अनुपानंद सद्गुरु विजयानंदजी महाराज (छत्रपती संभाजीनगर) यांच्या मधुर वाणीतून होणारी संगीतमय देवी भागवत कथा. घटस्थापना, देवीची आरती, भजन, शोभायात्रा, नवचंडी याग आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, बीड शहरातील श्री महालक्ष्मी कॉलनी, पोल फॅक्टरीच्या पाठीमागे, शाहूनगर येथे असलेल्य श्री महालक्ष्मी माता मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त तसेच आज पासून सुरू होणाऱ्या शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भरगच्च ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26